नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक १८९ * | * अमरावती * | रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### पंतप्रधान आजपासून तीन दिवस गुजरात दौऱ्यावर

**सोमनाथ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी १० ते १२ जानेवारीपर्यंत गुजरातच्या दौऱ्यावर असतील. ते शनिवारी संध्याकाळी सोमनाथला पोहोचतील. पंतप्रधान संध्याकाळी सोमनाथ ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतील आणि सोमनाथ सर्किट हाऊसमध्ये रात्री मुक्काम करतील. पंतप्रधान मोदींनी २०२६ मध्ये सोमनाथवर झालेल्या पहिल्या आक्रमणाला हजार वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित या कार्यक्रमाला 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' असे नाव दिले आहे. हे पर्व ८ ते ११ जानेवारीपर्यंत साजरे केले जात आहे. पंतप्रधान ११ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ९:४५ वाजता शौर्य यात्रेत सहभागी होतील. सुमारे २ किमी लांबीच्या या यात्रेत १०८ घोडे सहभागी होतील. शौर्य यात्रा सोमनाथ मंदिराच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या योद्ध्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी काढली जाते. या यात्रेचा समारोप सोमनाथच्या सद्भावना मैदानावर होईल. यानंतर पंतप्रधान सोमनाथ मंदिरात दर्शन, जलाभिषेक आणि पूजा-अर्चा करतील.

### जम्मू-काश्मीरमध्ये ड्रोनसह शस्त्रसाठा जप्त

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय सीमेजवळ पाकिस्तानहून ड्रोनने आणलेले शस्त्रास्त्र जप्त करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीप्रमाणे, दोन पिस्तूल, तीन मॅगझिन, १६ काडतुसे आणि एक ग्रेनेड तसेच इतर संबंधित वस्तू यावेळी जप्त करण्यात आल्या आहेत. सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात अडथळा आणण्याचा दहशतवाद्यांचा कोणताही प्रयत्न रोखण्यासाठी परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. संशयास्पद ड्रोन हालचालींची माहिती मिळाल्यानंतर सीमा सुरक्षा दल आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या विशेष ऑपरेशन्स ग्रुप यांनी संयुक्त पथक तयार करून पालोरा गावात शोधमोहीम सुरू केली.

# दळणवळणातून औद्योगिकीकरणाची नवी इकोसिस्टिम

## देवेंद्र फडणवीस यांनी दिले आश्वासन

**वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १० :**

जिथे विमानसेवा होऊ शकते ही कल्पनेपलीकडची गोष्ट होती तिथे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या दूरदृष्टीतून विमानतळच उभे राहिलेलले नाही तर येथे नाइट लँडिंग सुरू करण्यावरही आम्ही भर देणार आहोत. येथे वंदे भारत ट्रेन सोबतच नाशिक, सोलापूर अक्कलकोट हा महामार्ग सुरू करून सोलापूर शहर जगातील दहा बंदरांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराशी जोडल्या जात आहे. बंदराच्या माध्यमातून होणारा विकास गावोगावी पोहोचावा म्हणून रस्त्यांचे जाळे विणल्या जात आहे. या दळणवळणाच्या साधनातून औद्योगिक इकोसिस्टीम उभी करून सोलापूर उद्योग नगरी लवकरच भरभराटीला येईल असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या प्रचार सभेत व्यक्त केला.



राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने देवेंद्र फडणवीस यांची प्रचारसभा सोलापूर येथे आयोजित केली होती. या प्रचार सभेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की बहुभाषिक, बहुसांस्कृतिक, स्वाभिमानी लोकांची ही नगरी तेथील हातमाग, यंत्रमाग, विणकर, बिडी कामगार, शेती यांच्यासाठी ओळखली जाते. पण या शहराला आधुनिक शहराची ओळख देखील मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.या अनुषंगाने ते म्हणाले की, अन्न,वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यासाठी खेड्यातील माणूस हा शहरात येत असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि शहरीकरणामुळे झोपडपट्ट्या, पिण्याच्या पाण्याची अनास्था, घनकचरा, सांडपाणी, रोगराई अशा समस्या उद्भवतात. तेव्हा शहरातील सामान्य गरीब मध्यमवर्ग याच्या जीवनामध्ये परिवर्तन व्हायचे असेल तर शहराचा विकास झाला पाहिजे. गेल्या ७० वर्षापासून विकासापासून दूर असलेल्या शहरांच्या नियोजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, अमृत शहर योजना, स्वच्छ भारत शहरी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शहरी योजना यांच्या माध्यमातून कोटींचा निधी शहरांसाठी उपलब्ध करून दिला आहे. आणि यातूनच महाराष्ट्रातील शहरांचा विकास साधल्या जात आहे. सोलापूर शहरातील उद्योगांना नवीन उभारी मिळावी आणि जगातील उद्योग येथे पोहोचावे म्हणून येथे विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. विमानसेवा हे श्रीमंतांचे लक्षण नसून सामान्य माणसाच्या विकासाची आणि त्याच्या भरभराटीचे साधन आहे. आणि हीच दूरदृष्टी ठेवत नाशिक, सोलापूर, अक्कलकोट हा महामार्ग सुरू करून हे शहर जगातील १० बंदरांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराला जोडल्या जात आहे.

## इमारतीत भीषण आगीत तिघांचा गुदमरून मृत्यू

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**

गाढ झोपेत असलेल्या मुंबईकरांसाठी शनिवारीची पहाट भयावह ठरली. गोरेगाव पश्चिमेकडील भगतसिंग नगर परिसरातील एका इमारतीत पहाटे भीषण आग लागून तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

महापालिकेच्या अधिकृत माहितीनुसार, भगतसिंग नगर येथील एका इमारतीच्या तळमजल्यावरील घरात पहाटेच्या सुमारास अचानक आग लागली. प्राथमिक अंदाजानुसार फ्रिजचा मोठा स्फोट होऊन ही आग लागली असावी. सुरुवातीला आग तळमजल्यावरील विद्युत वायरिंग आणि घरगुती वस्तूंपुरती मर्यादित होती. मात्र काही वेळातच आगीने उग्र रूप धारण करत पहिल्या मजल्यावरील एका खोलीत प्रवेश केला आणि तेथे झोपलेल्या तीन जणांच्या कपड्यांना आग लागली.

# लाडक्या बहिणींच्या १५०० रुपयांमध्ये लवकरच वाढ

**महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच पक्षांच्या नेत्यांच्या विविध शहरांत सभा, मेळावे आणि बैठका सुरू आहेत. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने नेते मंडळी नागरिकांना अनेक आश्वासने देत आहेत. या अनुषंगाने आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घाटकोपरमध्ये सभा पार पडली.



या सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींसाठी मोठं आश्वासन दिलं आहे. लाडक्या बहिणींना दिल्या जाणाऱ्या १५०० रुपयांमध्ये लवकरच वाढ केली जाणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे.

घाटकोपरमध्ये क्लस्टर योजनेतील प्रत्येक कुटुंबाला हक्काचं घर देण्याचं काम केलं जाईल. कारण क्लस्टर योजना आम्ही त्यासाठी आणली आहे. त्यामध्ये आम्ही पात्र आणि अपात्र अशी भानगड ठेवली नाही. जेवढे लोक राहतात, त्या सर्वांना घरं देण्याचं काम या योजनेच्या माध्यमातून केलं जाईल. त्यासाठी नगरविकास विभाग पैसे कमी पडू आता लाडकी बहीण योजना सुरू आहे का? आहे ना? सगळ्या लाडक्या बहिणींना सांगतो, मी मुख्यमंत्री असताना लाडकी बहीण योजना सुरू केली, आता कोणी आलं आणि काहीही बोललं तरीही ही लाडकी बहीण योजना बंद होणार नाही.

आता लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळतात, आपण आता ते देखील वाढवणार आहोत. आम्ही आमच्या वचननाम्यात जे बोललो ते आम्ही करणार, लाडक्या बहिणींना स्वतःच्या पायांवर उभं करणार, लाडक्या बहिणींना लखपती झालेलं आम्हाला पाहायचं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

भाजपा नेते मंत्री गिरीश महाजन यांनी काही दिवसांपूर्वी समाज माध्यमावर पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये लाडकी बहीण योजनेबाबत माहिती देताना गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे. मकर संक्रांतीपूर्वी लाडक्या बहिणींना दिलासा देणारी ही मोठी भेट ठरेल.

येत्या १४ जानेवारीपूर्वी म्हणजेच मकर संक्रांतीच्या आधी राज्यातील पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यांचे एकत्रित ३००० रुपये जमा होणार आहेत. राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत ही रक्कम थेट लाभार्थी महिलांच्या खात्यात वर्ग केली जाणार असल्याचं मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे.



# दोन्ही राष्ट्रवादीचा संयुक्त जाहीरनामा जाहीर

## पुणेकरांना मोफत बस आणि मेट्रो सेवा देणार : अजित पवारांची मतदारांना ग्वाही

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :

पुणे महापालिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती सुपूर्द केल्यास नागरिकांना बस व मेट्रो सेवेचा मोफत लाभ देण्यात येईल, अशी घोषणा सत्ताधारी राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी केली. या योजनेमुळे शहर प्रदूषणमुक्त होईल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि पुणेकरांचे दररोज होणारे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान वाचेल, असे ते म्हणालेत.



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या वतीने शनिवारी अष्टसूत्री प्रगतीचा संयुक्त जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार चेतन तुपे, सुनील टिंगरे, दीपक मानकर, सुभाष जगताप, श्रीकांत पाटील, विशाल तांबे, प्रदीप देशमुख आदी दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, पुण्यात दररोज 30 लाख वाहने रस्त्यावर धावतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत इंधन आणि वेळेचा अपव्यय होतो. यामुळे पुणेकरांचे दररोज 30 कोटी रुपये, म्हणजेच वर्षाला 10 हजार 800 कोटी रुपये वाया जातात.

मोफत बस आणि मेट्रो सेवा दिल्यास दोन्ही कंपन्यांना मिळून वर्षाला केवळ 300 कोटी रुपये द्यावे लागतील.

अजित पवार यांनी यावेळी पुण्यातील जुने वाडे, म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास, झोपडपट्टी पुनर्वसन आणि 150 मॉडेल शाळा उभारण्याचेही आश्वासन दिले. तसेच, शहराला दररोज नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी तथा टँकर माफियांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी पाणीपुरवठा यंत्रणा सुधारण्यावर भर देण्याचीही ग्वाही दिली.

शहरातील गंभीर वाहतूक समस्या सोडवण्यासाठी खड्डेमुक्त रस्त्यांचे नियोजन आहे. स्वच्छ सर्वेक्षणामध्ये पुणे शहराला देशात आघाडीवर आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. सोसायट्यांना स्वच्छतेबाबत 20 टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. नागरिकांना हायटेक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच, कॉर्पोरेशन शाळेतील विद्यार्थ्यांना टॅबलेट दिले जातील. एवढेच नव्हे तर पालिकेचे मोफत कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना पाच लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याचे वचनही अजित पवार यांनी दिले आहे. प्रस्तुत जाहीरनामा पुढील 5 वर्षांसाठी आहे. आम्ही आळशी नसून, पहाटे 6 वाजेपासून रात्री उशिरापर्यंत काम करणारी माणसे आहोत. पुण्याची दिशा बदलणारा हा जाहीरनामा आहे, असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

पुणे महानगरपालिका क्षेत्रात 200 'राजमाता जिजाऊ क्लिनिक' (अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्र) उभारली जातील. येथे तपासणी, आरोग्य सेवा आणि महत्त्वाची औषधे मोफत मिळतील. यामुळे मोठ्या रुग्णालयांवरील ताण कमी होईल.

# भाजप राज्यातील सर्वात दुबळा पक्ष

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :

**निवडणूक आयोगावर मतदार यादीत घोळ घातल्याचा आरोप**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. पुणे येथे बोलताना सपकाळ यांनी भाजप हा राज्यातील सर्वात दुबळा पक्ष बनल्याचे म्हटले. निवडणूक आयोगाने मतदार यादीत घोळ घातल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

सपकाळ म्हणाले की, २८८ विधानसभा जागांसाठी झालेल्या निवडणुकीत मतदार यादीत घोळ असल्याचे निवडणूक आयोगाने मान्य केले होते. दुबार नावे शोधून एकाच ठिकाणी मतदान करण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्षात तसे झाले नाही. मनपा निवडणुकीतही निवडणूक आयोगाने मतदार यादीत घोळ घातला असून, यावर त्यांचा कोणताही धाक नसल्याचे सपकाळ यांनी म्हटले. प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून प्रभाग रचनेत गैरप्रकार झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

भाजपला आता निवडणुका जिंकण्यासाठी गैरप्रकार आणि भ्रष्टाचार करावा लागत आहे, तसेच दुसऱ्या पक्षातून उमेदवार घ्यावे लागत आहेत, असे सपकाळ यांनी नमूद केले. यामुळेच भाजप आज राज्यातील सर्वात दुबळा पक्ष बनला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी काँग्रेस प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, माजी आमदार दीप्ती चौधरी, ॲड. अभय छाजेड, राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, शहर उपाध्यक्ष अजित दरेकर आणि सरचिटणीस प्राची दुधाने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपवर दररोज टीका करतात, तरीही ते सत्तेत भाजपसोबत आहेत, यावर सपकाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अजित पवार यांचे हे वागणे योग्य नसल्याचे काँग्रेसची भूमिका आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लाचार असून, अजित पवार भ्रष्टाचाराचे आरोप करत असतानाही त्यांचा राजीनामा घेत नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 'नूरा कुस्ती' खेळत असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. सपकाळ यांनी मुंढवा जमीन प्रकरणात अप्रत्यक्ष भ्रष्टाचार झाल्याचा आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जैन बोर्डिंग जमीन प्रकरणात गैरप्रकार केल्याचा आरोप केला. अजित पवार भ्रष्टाचाराचे समर्थन करत असल्याचा दावाही त्यांनी केला.

पुण्यातील राजकारणी स्वार्थासाठी भूमिका बदलत असल्याचा आरोप करत, पुणे शहर आता विद्येचे माहेरघर किंवा सांस्कृतिक शहर न राहता 'ड्रग शहर' आणि 'कोयता शहर' बनले आहे, असे सपकाळ म्हणाले. सत्तेचे सौदागर शहर विकत घेण्यास लागले असून, शहराला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# एकाच नायलॉन मांजाने २ दुचाकीस्वारांचे गळे कापले

■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर , दि. १० :



सिडको एन-७ भागातील देवगिरी बँकेसमोर गुरुवारी (८ जानेवारी) सायंकाळी ५.३० च्या सुमारास तुटून आलेल्या एकाच नायलॉन मांजाने दोन दुचाकीस्वार जखमी झाले. या भीषण घटनेत एका तरुणाच्या डोळ्याला तब्बल २१ टाके पडले असून, दुसऱ्या तरुणाच्या मानेला ३ टाके पडले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, सय्यद अहमद रक्ताने माखलेले असतानाच, त्यांच्या अगदी मागून येणारे शेख यासीन शेख मोसीन (रा. रहेमानिया कॉलनी) हेदेखील त्याच लोंबकळणाऱ्या मांजाच्या विळख्यात अडकले. त्यांच्या मानेला मांजाने जोरात घासले गेल्याने तेदेखील गंभीर जखमी झाले. भररस्त्यात दोन तरुण एकामागून एक रक्ताने माखलेले पाहून नागरिक हादरून गेले.

रस्त्यावरील नागरिकांनी प्रसंगावधान राखून या दोघांच्या अंगावर गुंडाळलेला मांजा कापला आणि त्यांना तातडीने एमजीएम रुग्णालयात हलवले. उपचारादरम्यान सय्यद अहमद यांच्या डोळ्याच्या बाजूला झालेली जखम इतकी खोल होती की, डॉक्टरांना २१ टाके घालावे लागले. थोड्या फरकाने त्यांचा डोळा वाचला असला तरी चेहऱ्यावर कायमस्वरूपी व्रण उमटले आहेत, तर शेख यासीन यांच्या मानेला ३ टाके पडले असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

# प्रेमीयुगुलाची फाशी घेऊन आत्महत्या

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १० :

प्रेमाचं गणित बिनसल्याने दुःखी असलेल्या प्रेमीयुगुलाने कोल्हापूरच्या जंगलात फाशी लावून, मृत्यूचा मार्ग स्विकारल्याची दुर्दैवी घटना पुढे आली आहे. दोघांनी चार दिवसांपूर्वी फाशी घेतल्याने, परिसरात दुर्गंधी पसरली होती. नजिकच्या शेतात काम करणाऱ्या एका व्यक्तीला झाडावर लटकलेले मृतदेह दिसल्याने घटना उघडकीस आली.

ओंकार ऊर्फ उदय बरगे आणि अकरावीत शिकणाऱ्या त्याच्या प्रेयसीने गळफास लावल्याची घटना कोल्हापूरनजिकच्या तरसंबळे जंगलहद्दीत घडली. शेळेवाडी गावातील रहिवासी ओंकार हा 28 वर्षांचा होता.



तो कष्टाळू होता आणि त्याचा बिद्री साखर कारखान्याला ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर होता. तर, 17 वर्षीय युवती राधानगरीची रहिवासी असून अकरावीत शिकत होती. तरसंबळे जंगलात मुख्य रस्त्यापासून एक किलोमीटर आत जाऊन दोघांनी फाशी घेतली.

या घटनेमुळे दोघांच्याही गावात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, प्राथमिक तपासा हे प्रेमप्रकरण दिसत असले तरी पोलिस सर्व शक्यतांचा तपास करीत आहेत.

ओंकारच्या पश्चात आईवडील आणि लहान भाऊ असा परिवार आहे. दोघांनीही आत्महत्येपूर्वी कोणतेही पत्र लिहून ठेवलेले नाही. त्यामुळे, पोलिसांनी त्या दोघांनी टोकाचे पाऊल का उचलले? याचा लवकरात लवकर शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# लंडनस्थित डॉ. संग्राम पाटलांना मुंबई विमानतळावर अटक

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. १० :

आपल्या निर्भीड राजकीय मतांसाठी आणि कोरोना काळात केलेल्या जनजागृतीसाठी प्रसिद्ध असलेले लंडनस्थित डॉ. संग्राम पाटील यांना मुंबई विमानतळावर उतरताच पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या अनपेक्षित कारवाईमुळे राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, प्रशासनाच्या या भूमिकेवर तीव्र टीका होत आहे. डॉ. पाटील यांना नेमक्या कोणत्या कारणास्तव रोखण्यात आले, याचा खुलासा अद्याप पोलिसांनी केलेला नाही, मात्र या कारवाईचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



आणि ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. ही कारवाई म्हणजे लोकशाहीची गळचेपी असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

डॉ. संग्राम पाटील हे व्यवसायाने डॉक्टर असून लंडनमध्ये स्थायिक आहेत. कोरोना महासाथीच्या काळात जेव्हा जगभरात भीतीचे वातावरण होते, तेव्हा डॉ. पाटील यांनी आपल्या युट्युब चॅनल आणि फेसबुक पेजच्या माध्यमातून लाखो लोकांना धीर देण्याचे काम केले होते. विज्ञानावर आधारित माहिती आणि खरी परिस्थिती मांडत असतानाच त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही अनेकदा सडेतोड टीका केली होती. याच कारणावरून त्यांच्या फेसबुक अकाऊंटवर काही काळ निर्बंधही घालण्यात आले होते, ज्याचा खुलासा त्यांनी स्वतः एका व्हिडिओद्वारे केला होता.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी डॉ. संग्राम पाटील यांच्या अटकेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. "भारतात लोकशाही जिवंत आहे का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

"सडेतोड राजकीय भूमिका घेणाऱ्या डॉ. संग्राम पाटलांना मुंबई विमानतळावर येताक्षणीच अटक करणे अत्यंत दुर्दैवी आहे. ही कारवाई आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची नाचक्की करणारी आहे. मुंबई पोलीस आणि गृह मंत्रालयाने डॉ. पाटलांना नेमकी कोणत्या कारणास्तव अटक केली, याचा तातडीने खुलासा करावा. काँग्रेस पक्ष या दडपशाहीचा जाहीर धिक्कार करतो," अशी संतप्त प्रतिक्रिया हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

# आरोग्य विभागातील बदल्या मूल्यांकन प्रणालीनुसार कामगिरीवर व्हाव्यात

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. १० :



राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्राच्या (एसएचएसआरसी) प्रणालीद्वारे केलेल्या कामगिरीच्या मूल्यांकन अहवालानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली, बढती करावी. त्यामुळे बढती आणि बदल्या पारदर्शकपणे होतील, अशी सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली.

केंद्र सरकारची राष्ट्रीय आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र ही संस्था देश पातळीवर आरोग्य विभागास तांत्रिक सहकार्य करते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र ही संस्था कार्यरत आहे. राज्याच्या आरोग्य विभागाची गुणवत्ता वाढ, आरोग्यविषयक संशोधन व तांत्रिक सहकार्य या संस्थेच्या वतीने देण्यात येते. आरोग्य विभागामार्फत एसएचएसआरसी संस्था राज्यातील सर्व जिल्ह्यांतील व महापालिका क्षेत्रातील आरोग्य संस्थांचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यांकन करते.

# मुंबईत काँग्रेसचा 'स्वबळ' की 'केविलवाणा' लढा?

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १० :



मुंबई महानगरपालिकेच्या अटीतटीच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाने पहिल्यांदा राज ठाकरे यांच्या 'मनसे'ला साद घालत युती केली. त्यानंतर काँग्रेसलाही सोबत घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले, मात्र मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी या प्रस्तावाला हरताळ फासत 'स्वबळा'चा नारा दिला. वंचित बहुजन आघाडीसोबत युती करूनही तब्बल ३६ जागांवर उमेदवार उभे करण्यात या आघाडीला अपयश आले असून, यामुळे राजकीय वतुर्ळात वर्षा गायकवाड यांच्या 'बालहट्टा'ने काय साध्य झाले? मोठी चर्चा रंगली आहे.

शिवसेना ठाकरे गटाने सुरुवातीला राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेतले आणि त्यानंतर काँग्रेसलाही सोबत घेण्यासाठी मनस्वी प्रयत्न केले. मात्र, खासदार वर्षा गायकवाड यांनी या प्रस्तावाला कडाडून विरोध करत स्वबळाचा नारा दिला. राज ठाकरेंची विचारसरणी आणि उत्तर भारतीय मतपेढीचा दाखला देत त्यांनी युती नाकारली. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या मैदानात काँग्रेसची अवस्था 'तोळामासा' झाली असून, कार्यकर्त्यांची फळी असतानाही २० जागांवर उमेदवार न दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

प्रभाग क्रमांक ६, ११, १२, १३, १४, १५, १९, २१, ३०, ४६, ८०, ८४, ११७, १५३, १८२ आणि १९८ मध्ये काँग्रेसचा एकही अधिकृत उमेदवार रिंगणात नाही. त्यामुळे वर्षा गायकवाड यांनी हट्ट करूनही जागा रिकाम्या राहिल्याने मुंबई काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आणि दुफळी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी निधी द्या

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. १० :

इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेतत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने सर्व शाळांना दिले आहेत. मात्र सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीबाबत कोणतीही स्पष्टता न देता विभागाने याची जबाबदारी थेट शाळा व्यवस्थापनावर ढकलण्यात आली आहे. ही यंत्रणा बसविणे खर्चिक असल्याने सरकारने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अन्यथा शाळांचे केंद्र रद्द करण्यात यावे, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे.

राज्य मंडळाच्या वतीने फेब्रुवारी - मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचे शालेय शिक्षण विभागाने बंधनकारक केले आहे. या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देऊन तीव्र आक्षेप नोंदवला. सीसी टीव्ही कॅमेरे बसवणे, त्याची देखभाल, संचयन (स्टोरेज) आणि तांत्रिक व्यवस्था ही अत्यंत खर्चीक बाब आहे.

ही यंत्रणा अनिवार्य असेल, तर त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. तसेच सीसी टीव्ही कॅमेरे उपलब्ध नसतील, तर संबंधित शाळांतील परीक्षा केंद्र रद्द करावे, असेही या निवेदनामध्ये महामंडळाने म्हटले आहे.

# चिमुरड्यांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीला भाजपकडून इनाम

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. १० :

अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील युतीबाबत बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. अजित पवार यांनी भाजपसोबत हातमिळवणी केली असली, तरी सध्याच्या निवडणुकीत ते भाजप सोडून आमच्यासोबत लढत आहेत, हे आमच्यासाठी अधिक महत्त्वाचे असल्याचे राऊत यांनी सांगितले. राजकारणात भूमिका आणि बाजू वेळेनुसार बदलत असतात, मात्र भाजपविरोधात उभे राहणे हा मुद्दा आमच्यासाठी निर्णायक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



याच पार्श्वभूमीवर अजित पवार आणि सुप्रिया सुळे एकत्र आल्याचे चित्र समोर आले असले, तरी त्यात कोणतेही आश्चर्य वाटण्यासारखे नाही, असे मतही संजय राऊत यांनी व्यक्त केले. पवार कुटुंबीयांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू भाजपविरोध हाच राहिला असून, शरद पवार यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना ठाम विरोध आहे, असे राऊत म्हणाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडी या वैयक्तिक नसून राजकीय भूमिकांवर आधारित असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बदलापूर महानगरपालिकेत तुषार आपटे यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त करण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेषतः या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर बदलापूर महानगरपालिकेतील वातावरण तापले असून, आगामी काळात याचे पडसाद राजकीय पातळीवर उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणावर संजय राऊत यांनी जोरदार टीका करत भाजपवर निशाणा साधला आहे. राऊत यांनी आरोप केला की, तुषार आपटे हे बदलापूरमधील लैंगिक अत्याचार प्रकरणात सहआरोपी आहेत. अशा गंभीर आरोपांचा सामना करणाऱ्या व्यक्तीला स्वीकृत नगरसेवक बनवण्याचा निर्णय अत्यंत धक्कादायक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र प्रत्यक्षात अशा प्रकारच्या नियुक्त्या करून चुकीचा संदेश दिला जात असल्याचा आरोपही राऊत यांनी केला.

# दादागिरीची भाषा आम्हाला शिकवू नका

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १० :



"आम्ही मंत्री पदाला लाथ मारून बाहेर पडलो आहोत. शंभर दिवस शेळीसारखे जगण्यापेक्षा दहा दिवस वाघासारखे जगू. त्यामुळे आम्हाला दादागिरीची भाषा शिकवू नका, तो आमचा जुना 'धंदा' आहे. आम्ही असेच आमदार झालो नाहीत. आम्हाला ३०२, ३०७ चांगलीच माहिती आहेत. ज्याच्यावर साधी एकही केस नाही, तो शिवसैनिक कसला?" अशा आक्रमक शब्दांत शिवसेना नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर आणि स्थानिक पोलिसांवर हल्लाबोल केला. ते अहिल्यानगर येथील सभेत बोलत होते.

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. 2023 मध्ये कार्यकाळ संपलेल्या अहिल्यानगर महानगरपालिकेत गेल्या दोन वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत. त्यामुळे येथील महानगरपालिका निवडणूक विशेष लक्षवेधी ठरणार आहे. 2003 मध्ये या महानगरपालिकेत गेल्या 20 वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सर्वच पक्षांचे महापौर झाले आहेत. दोन वर्षांनंतर निवडणूक होत असल्याने सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांसाठी आयोजित सभेत गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

अहिल्यानगरच्या पाणीपुरवठा योजनेवरून गुलाबराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला थेट आव्हान दिले. ते म्हणाले, "माझे राष्ट्रवादीवाल्यांना चॅलेंज आहे, नगरची पाणीपुरवठा योजना या पठ्ठ्याने मंजूर केली आहे. 'पोरं तुम्ही पैदा करायची आणि बारसं आम्ही करायचं', हा धंदा आता चालणार नाही." अहिल्यानगर हा शिवसेनेचा अभेद्य बालेकिल्ला असून दिवंगत अनिल भैय्या राठोड येथून पाच वेळा निवडून आले होते, याची आठवणही त्यांनी करून दिली.

अहिल्यानगर शहरातील वाढत्या गुन्हेगारी आणि पोलिसांच्या भूमिकेवर बोट ठेवताना पाटील यांनी पोलिसांनाही दम भरला. "अहिल्यानगरचे पोलीस पिस्तूल घेऊन दादागिरी करतात. पण आम्हाला दाबायचा प्रयत्न करू नका. आम्ही रबरी चेंडूसारखे आहोत, जेवढे दाबाल तेवढी उंच उडी घेऊ. माझ्यावर चोरी, दरोडा किंवा बलात्काराच्या नाही, तर आंदोलनाच्या ३५ केसेस आहेत. 'आय लव्ह यू' केसेस आहेत त्या," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये जोश भरला.

# ऑनलाइन गेममुळे तरुणाची लाखोंची फसवणूक

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :

ऑनलाइन गेमच्या आमिषाने एका तरुणाची तब्बल ३६ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सायबर चोरट्यांविरुद्ध माहिती-तंत्रज्ञान कायदा आणि फसवणुकीचा गुन्हा वाघोली पोलिसांनी दाखल केला आहे.

या प्रकरणी एका व्यावसायिकाने वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ३० वर्षीय तरुण वाघोली भागातील एका सोसायटीत राहतो. गेल्या वर्षी त्याच्या मोबाइल क्रमांकावर गुंतवणुकीबाबत एक संदेश आला होता, ज्यात चांगल्या परताव्याचे आमिष दाखवण्यात आले होते.

चोरट्यांनी तरुणाला एक लिंक पाठवून ऑनलाइन गेम खेळल्यास चांगले पैसे मिळतील, असे सांगितले. या आमिषाला बळी पडून तरुणाने गेल्या आठ महिन्यांत ऑनलाइन गेमच्या नादात ३६ लाख ७४ हजार रुपये चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

दरम्यान, 'ऑनलाइन टास्क'च्या आमिषाने आणखी एका तरुणाची सहा लाख ७७ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार हडपसर परिसरात घडला आहे. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जनआक्रोशाला अखेर यश

## भाजपची नामुष्की टाळण्यासाठी तुषार आपटेंचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. १० :

बदलापूरमधील बाल लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे आधीच संवेदनशील बनलेल्या राजकीय वातावरणात मोठी घडामोड घडली आहे. या गंभीर प्रकरणातील सहआरोपी आणि बदलापूर-कुळगाव नगरपालिकेतील भाजपचे स्वीकृत नगरसेवक तुषार आपटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाच्या वरिष्ठांच्या सूचनेनंतर आपटे यांनी स्वखुशीने राजीनामा सादर केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, अवघ्या एका दिवसापूर्वीच त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे या राजीनाम्यामुळे बदलापूरसह संपूर्ण राज्याच्या राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आले आहे.

बदलापूर येथील शाळेत शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवरील बाल लैंगिक अत्याचार प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या प्रकरणात तुषार आपटे हे सहआरोपी असून सध्या ते जामिनावर बाहेर आहेत. असे



असतानाही त्यांना भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपद देण्यात आल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. सामाजिक संघटना, पालकवर्ग तसेच विविध राजकीय पक्षांनी या नियुक्तीवर आक्षेप घेत संताप व्यक्त केला होता. आरोपी असलेल्या व्यक्तीला लोकप्रतिनिधी म्हणून मान्यता देणे म्हणजे पीडितांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली होती.

तुषार आपटे यांची नियुक्ती कालच कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या कार्यकारिणी बैठकीत जाहीर करण्यात आली होती. मात्र नियुक्ती होताच काही तासांतच विरोधकांकडून आणि नागरिकांकडून तीव्र आंदोलनाची भाषा सुरू झाली. भाजपची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप होत होता आणि आपटेंची तत्काळ हकालपट्टी करण्याची मागणी जोर धरू लागली होती. या पार्श्वभूमीवर पक्षावर वाढता दबाव लक्षात घेता अखेर आपटेंनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

पक्षाची बदनामी होत असल्याची जाणीव झाल्यानंतर आणि वरिष्ठांकडून स्पष्ट संदेश मिळाल्यानंतर तुषार आपटे यांनी स्वतःहून स्वीकृत नगरसेवकपद सोडले. त्यांनी आपला राजीनामा अधिकृतरीत्या सादर करत पदाचा त्याग केल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे भाजपने वाढता राजकीय व सामाजिक दबाव काही अंशी कमी करण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जात आहे. मात्र, या प्रकरणामुळे भाजपच्या निर्णयक्षमतेवर आणि नैतिक भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे चित्र आहे.

# विरोधी बाकावर बसणार अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस?

■महापालिकेची निवडणूक ठरविणार 2028 मधील आमदार

■भाजप घेणार का अपमानचा बदला ?







**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )**- 2024 च्या विधानसभा निवडणूकीत देशातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांना अमरावती विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्या स्थानिक आमदारांकडून मोठा अपमान सहन करावा लागला. राज्यात युतीत असताना विधानसभा निवडणूकीत मात्र त्यांना डावलण्यात आले. पदोपदी त्यांना दुर्लक्षीत करण्यात आले, त्यामूळे येत्या सन 2028 च्या निवडणूकीत अमरावतीची ही जागा भाजप च्या पारड्यात पाडून घेण्यासाठी स्थानिक नेत्यांचे प्रयत्न असतील यात दुमत नसावे. याच पार्श्वभूमिवर आजची महापालिका निवडणूक ही येणाऱ्या 2028 मधील विधानसभेतील आमदार ठरविण्यासाठी महत्वाची ठरणार आहे. त्यामूळे काहीही झाले तरी सत्ताधारी भाजप ही संधी गमाविणार नाही, आणि महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसला विरोधी बाकावर बसवेल अशी परिस्थिती आहे.

महापालिकेच्या 27 प्रभागांमधून 87 नगरसेवक 16 जानेवारीला निवडूण सभागृहात जाणार आहे. हे 87 नगरसेवक म्हणजे आगामी विधानसभेच्या निवडणुकीसाठी भाजपच्या किल्ल्याचे बुरुज राहतील. मुस्लिम क्षेत्रात भाजपला हे बुरुज काबीज करणे जरी कठीण असले तरी इतर प्रभागांमध्ये हे बुरुज आपल्या ताब्यात ठेवणे भाजप व इतर पक्षांना गरजेचे बनले आहे. ही महापालिका निवडणूक येणाऱ्या लोकसभा निवडणूकीवरही परिणाम करणारी ठरणार आहे. इतकेच काय तर भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेवर कुणाची वर्णी लागेल हे सुध्दा वर्तमानातील ही निवडणूक ठरविणार आहे. त्यामूळे अवघे चार दिवस हाती असताना कोणता पक्ष काय जादू करेल आणि महापालिकेत आपला उमेदवार बसवेल हे येणाऱ्या 16 जानेवारीलाच ठरणार.

## मुख्यमंत्र्यांकडून राणा दाम्पत्याला 'खुली छूट'

भारतीय जनता पक्षात सुरुवातीलाच तिकीट वाटपावरुन निर्माण झालेली अस्थिरता महद प्रयासानेही पाहीजे तशी दूर करता आलेली नाही. त्यामूळे मुख्यमंर्त्यांनी साम, दाम, दंड, भेद, काय वापरायचे आहे, ते वापरा आणि भाजप व युवा स्वाभिमानच्या जास्तीत जास्त जागा निवडूण आणा अशी 'खुली छूट' राणा दाम्पत्याला दिली आहे. कारण प्रचारात आणि चर्चेत राहण्यात तुर्तास शहरात कुणी त्यांचा हात पकडत नाही. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने गुंड, सट्टेबाजांना तिकीट वाटप केल्याच्या आरोपाने राष्ट्रवादीतही आलबेल नाही. तसेच निवडूण यावे असे क्लिन चेहरे सुध्दा राष्ट्रवादीकडे नाही. त्यामूळे जास्तीत जास्त 15 ते 20 जागांपेक्षा जास्त जागा राष्ट्रवादीच्या पारड्यात पडेल असे दिसत नसल्याचे राजकीय तज्ञांचे म्हणणे आहे.

## काँग्रेसमध्ये 'सन्नाटा'

शोले चित्रपटातील 'इतना सन्नाटा क्यो है भाई' हा डायलॉग काँग्रेसच्या सध्यास्थितीला शोभून दिसत आहे. कोणत्या बड्या नेत्याची सभा नाही, किंवा स्टार प्रचारकाकडून प्रचार नाही. जे काही आहे ते फक्त स्थानिक नेत्यांच्या भरवश्यावर. त्यात माजी मंत्री डॉ. सुनिल देशमूख यांच्या मातोश्रीचे निधन झाल्याने भेटीगाठी घेणाऱ्यांची रिघ सध्या त्यांच्या निवासस्थानी आहे. त्यामूळे देशमूखांना प्रचारासाठी पाहीजे तेवढी फुर्सत मिळत नसल्याचे दिसत आहे. काही जागांची शाश्वती सोडल्यास काँग्रेसच्या इतर जागांचे भविष्य काय? किंवा चिखलदरा नगर परिषदेप्रमाणे येथेही छुपा प्रचार परिवर्तन घडविणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

# युतीच्या जागा धोक्यात असलेल्या ठिकाणी 5 अपक्षांना पाठींबा

**भाजप ची खेळी | युवा स्वाभिमान व भाजपमध्ये उभी फुट**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 )**- महानगरपालिका निवडणुकीत जागा सोडलेल्या ठिकाणी युवा स्वाभिमानचेही उमेदवार कमकुवत दिसत असल्याने भाजपने थेट खेळी करत 5 अपक्षांना पाठींबा दर्शविला आहे. ज्यामूळे निवडणूकीच्या तोंडावर भारतीय जनता पक्ष आणि युवा स्वाभिमान पक्षाच्या युतीमध्ये उभी फुट पडल्याचे जाणवत आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात भाजपने वायएसपीसाठी राखीव असलेल्या जागांवर थेट अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देत युतीवर शिक्कामोर्तब केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

येत्या 15 जानेवारी रोजी होणाऱ्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष (वायएसपी) यांच्यात युती जाहीर करण्यात आली होती. या युतीनुसार भाजपने एकूण 75 जागा लढवण्याचा निर्णय घेतला होता, तर वायएसपीसाठी 5 जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रभाग क्रमांक 9 मधील तीनपैकी दोन, तसेच प्रभाग क्रमांक 17, वॉर्ड क्रमांक 20 आणि वॉर्ड क्रमांक 21 मधील प्रत्येकी चारपैकी दोन जागांचा समावेश होता.

मात्र, निवडणूक प्रचाराचा कालावधी संपण्यास अवघे तीन दिवस शिल्लक असतानाच भाजपने अचानक वायएसपी उमेदवारांऐवजी प्रमुख अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्याची घोषणा केली. त्यामुळे भाजपङ्कवायएसपी युती प्रत्यक्षात पूर्णपणे संपुष्टात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

जरी अनेक स्थानिक भाजप नेते अधिकृत प्रतिक्रिया देण्याचे टाळत असले, तरी प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव वेगळेच चित्र दाखवत आहे. भाजपच्या प्रचारात आता वायएसपीचे नावही घेतले जात नसल्याचे दिसून येत आहे. आज पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या चपरासीपुरा परिसरातील प्रचार सभेत युवा स्वाभिमान पक्षाचा किंवा त्यांच्या उमेदवारांचा एकदाही उल्लेख झाला नाही.

विशेष म्हणजे, भाजपने प्रभाग क्रमांक 9 (एसआरपीएफ वडाळी) येथील तीनपैकी दोन जागा वायएसपीसाठी सोडल्या होत्या. या जागांवर वायएसपीकडून सपना ठाकूर आणि आशिष गावंडे यांना 'पाना' या निवडणूक चिन्हावर उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, पालकमंत्री बावनकुळे यांनी या जागांवर भाजप उमेदवारांऐवजी अपक्ष उमेदवार अनिल सोनटक्के आणि गौरी सरबेरे यांना थेट पाठिंबा दिला. या दोन्ही उमेदवारांचे व्यासपीठावर औपचारिक स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या निवडणूक चिन्हांचाही जाहीर उल्लेख करण्यात आला.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाषणात आश्चर्यकारक विधान करत सांगितले की, या विभागात भाजपचा उमेदवार एका जागेवर 'सफरचंद' तर दुसऱ्या जागेवर 'माचीसची काठी' घेऊन निवडणूक लढवत आहे. या विधानामुळे भाजपङ्कवायएसपी युती संपल्याचे संकेत अधिक ठळक झाले.

दरम्यान, युती असूनही वायएसपी नेते आणि आमदार रवी राणा यांनी अनेक ठिकाणी भाजप उमेदवारांविरोधात स्वत:चे उमेदवार उभे केले होते. त्यांच्या पत्नी, भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनीही अनेक प्रभागांमध्ये भाजप उमेदवारांऐवजी वायएसपी उमेदवारांसाठी प्रचार केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोच्या दिवशीच नवनीत राणा यांनी साईनगर येथील वॉर्ड क्रमांक 19 मध्ये वायएसपी उमेदवार सचिन भेंडे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन केले होते.

विलास नगरङ्कमोरबाग येथील वॉर्ड क्रमांक 6 मध्ये मंगळवारी त्यांनी तीन कमळ, एक पन्ना असा नारा देत वायएसपी उमेदवार दीपक साहू सम्राट यांच्यासाठी प्रचार केला. यामुळे भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये आणि उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. त्याचेच प्रतिबिंब आज पालकमंत्री बावनकुळे यांच्या चपरासीपुरा येथील सभेत दिसून आले.


उल्लेखनीय बाब म्हणजे, या सभेत माजी खासदार नवनीत राणा स्वत: व्यासपीठावर उपस्थित असताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मतदारांना थेट वायएसपी उमेदवारांऐवजी अपक्ष उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. या अचानक बदललेल्या भूमिकेमुळे नवनीत राणा या केवळ मूकदर्शक बनून राहिल्याचे दिसून आले.

दरम्यान, भाजपने प्रभाग क्रमांक 9 व्यतिरिक्त प्रभाग क्रमांक 17 (गडगडेश्वर) येथील ए-सीटवर संतोष पिढेकर आणि प्रभाग क्रमांक 21 (जुनी बस्ती, बडनेरा) येथील योगेश निमकर यांनाही पाठिंबा जाहीर केला आहे. प्रभाग क्रमांक 20 (सुतगिरणी, समरा नगर) बाबत मात्र भाजपने अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. एकूणच, अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपङ्कवायएसपी युतीचा औपचारिक अंत झाला असून, त्याचे स्पष्ट संकेत आता प्रचारातूनही ठळकपणे दिसून येत आहेत.

# प्रभाग 7 मधील काँग्रेस उमेदवाराच्या जात प्रमाणपत्रावर गंभीर आक्षेप

**जिल्हाधिकारी व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार**

**चौकशी व कठोर कारवाईची मागणी**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक 7 (जवाहर स्टेडियम परिसर) येथून काँग्रेसतर्फे उमेदवारी लढवणाऱ्या मनीष चेतनदास बजाज यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेत जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.


विष्णू बंसीलाल व्यास यांनी ही तक्रार केली असून, मनीष बजाज हे प्रत्यक्षात खुल्या प्रवर्गातील असताना त्यांनी ओबीसी प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, मनीष बजाज यांच्या भावांच्या शालेय शिक्षणाच्या नोंदींमध्ये प्रवर्ग 'खुला' असा उल्लेख असल्याचे सांगण्यात आले आहे.

या सर्व बाबींची प्रशासनाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. खोटे जात प्रमाणपत्र वापरल्याचे सिद्ध झाल्यास उमेदवाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरोधातही कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीमुळे प्रभाग 7 मधील राजकीय वातावरण तापले असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रविवार बनणार प्रचार वार!

**मंगळवारी सायंकाळी 5.30 वाजता थांबणार प्रचार तोफा**

**उमेदवारांचे पदयात्रा, घरोघरी भेटींवर भर, सोशल मिडियाचा वापर**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 )**- महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सध्या जोरात असून उमेदवार पदयात्रा, होम टू होम प्रचारावर भर देत आहेत. प्रत्येक उमेदवारांनी लावलेल्या रिक्षा गल्लीगल्लीत प्रचार करीत आहेत. महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा 13 जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता थंडावणार आहेत. त्यामूळे सुटीचा दिवस असलेला रविवार प्रचार वार ठरणार आहे. निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार प्रचारासाठी उमेदवारांकडे आता चार दिवस आहेत.

महापालिकेच्या 87 नगरसेवकांसाठी तब्बल साडे सहाशे उमेदवार मैदानात आहेत. भाजपने 55 हून अधिक जागा निवडून येतील, असा दावा केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस ने 'महापौर आमचाच' असा विश्वास व्यक्त केला आहे. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, मनसे या सर्वांची महाविकास आघाडीदेखील एकत्रितपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे.

सध्या कोणाच्या पदयात्रेत गर्दी जास्त, कॉर्नर बैठका, सभांमध्ये किती लोक येतात, यावर सर्व पक्षाचे पदाधिकारी लक्ष ठेवून आहेत. प्रचार आता रंगात आला असून प्रचाराला चार दिवसच शिल्लक राहिले आहेत. शेवटच्या दोन दिवसांत मतदारांना विविध प्रलोभने, वस्तू, पैशांचे वाटप होऊ शकते. काही ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त ओला यांनी 12 ते 17 जानेवारीपर्यंत बंदोबस्ताचे तगडे नियोजन केले आहे.

### 13 व 14 जानेवारीला पोलिस अन् भरारी पथकांची गस्त

मंगळवारी (ता. 13) सायंकाळी साडेपाच वाजता प्रचार संपणार आहे. त्यानंतर 15 जानेवारीला सकाळी मतदानाला सुरवात होईल. तत्पूर्वी, 13 व 14 जानेवारीच्या दिवस-रात्री तब्बल 48 तास निवडणूक आयोगाची भरारी पथके शहरभर फिरणार आहेत. याशिवाय पोलिसांचीही रात्रगस्त प्रभावीपणे असणार आहे. शेवटच्या 48 तासांत भरारी पथकांचे व पोलिसांचे विशेष लक्ष उमेदवारांची घरे, संपर्क कार्यालयांवर असणार आहे. सध्या गुप्तवार्ता विभाग, गुन्हे शाखा, पोलिस ठाण्यांची पथके, गुन्हे प्रकटीकरण पथके शहरभर गस्त घालत आहेत.

### निवडणुकीसंदर्भात ठळक

**प्रचार थंडावणार**
13 जानेवारी (सायंकाळी 5.30)

**मतदान**
15 जानेवारी (सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30)

**मतमोजणी**
16 जानेवारी

# राजस्थान खूनप्रकरणातील फरार आरोपीच्या आवळल्या मुसक्या



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 10 )** – राजस्थान राज्यातील नागद्वारा येथील श्रीनाथजी मंदिर पोलीस स्टेशनमध्ये दाखल खुनाच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला मोर्शी शहरातून अटक करण्यात मोर्शी पोलिसांना यश आले आहे. आरोपी मोहम्मद इशाक मोहम्मद शफी लोहार (वय 38) याच्याविरुद्ध अप. क्र. 234/2025, कलम 103(1) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल आहे. राजस्थान पोलिसांकडून मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सदर आरोपी मोर्शी शहरात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर तात्काळ कारवाई करत मोर्शी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. अटकेनंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला राजस्थान पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, स्वप्निल बायस्कर व अथर्व कोहळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. फरार आरोपीला अटक करून दुसऱ्या राज्यातील पोलिसांच्या ताब्यात देणे ही समन्वयाची उत्कृष्ट उदाहरणात्मक कारवाई असून, यामुळे गंभीर गुन्ह्यांतील आरोपी कितीही दूर लपले तरी कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाहीत, असा स्पष्ट संदेश समाजात गेला आहे.

# शहरासह गावखेड्यात नायलॉन मांजाचा 'फास'!

**पक्षी, नागरिकांच्या जीवाला धोका | प्रशासनाच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष**

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.10 )** – शहरासह ग्रामीण भागात पतंग उडविण्यासाठी चायनीज नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून तो नागरिक व पक्ष्यांसाठी जिवघेणा ठरत आहे. जरी उच्च न्यायालयाने नायलॉन मांजाच्या विक्रीवर बंदी घातली असली, तरीही बाजारात त्याची सर्रास विक्री होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या मांजामुळे दुचाकीस्वारांच्या गळ्याला गंभीर जखमा होण्याच्या घटना घडत असून काही प्रसंगी जीवितहानीही झाली आहे. तसेच मांजात अडकून अनेक पक्ष्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.



### पक्ष्यांना सर्वाधिक धोका

नायलॉन मांजामुळे सर्वाधिक फटका पक्ष्यांना बसत आहे. आकाशात उडणारे पक्षी या मांजात अडकून गंभीर जखमी होतात. अनेक वेळा त्यांच्या पंखांना किंवा मानेभोवती मांजा अडकून त्यांचा मृत्यू होतो. पर्यावरणप्रेमींनी याबाबत चिंता व्यक्त करत नायलॉन मांजावर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### बंदी असूनही सर्रास विक्री

उच्च न्यायालयाने नायलॉन मांजाच्या विक्रीवर बंदी घातलेली असताना देखील अनेक ठिकाणी त्याची खुलेआम विक्री सुरू आहे. प्रशासन व पोलिस यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. घटनांनंतरही ठोस कारवाई न झाल्याने विक्रेत्यांचे मनोबल वाढले आहे.

### जिवघेणा नायलॉन मांजा, अपघातांचा धोका वाढला

मकरसंक्रांतीनिमित्त पतंग उडवण्याची परंपरा असून शहर व गावातील मुले तसेच तरुण मोठ्या उत्साहात या उपक्रमात सहभागी होतात. प्रतिस्पर्ध्याची पतंग कापण्यासाठी अनेकजण नायलॉन मांजाचा वापर करतात. हा मांजा अतिशय धारदार व मजबूत असल्याने तो गळ्यावर आल्यास गंभीर जखम होऊ शकते. अनेक वेळा मांजा दिसत नसल्यामुळे दुचाकीस्वारांना अचानक गळ्याला फास बसण्याचा धोका निर्माण होतो, विशेषत: उड्डाण पुलांवरून जाताना हा धोका अधिक असतो.

### नागरिकांना आवाहन

नागरिकांनी सुरक्षिततेसाठी नायलॉन मांजाचा वापर टाळावा, साध्या कापसाच्या मांजाचाच वापर करावा तसेच दुचाकीस्वारांनी प्रवास करताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. नायलॉन मांजावर बंदी प्रभावीपणे राबविली गेल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### पतंग विक्रेत्यांची झाडाझडती

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बाजारात विविध प्रकारच्या पतंग व मांजाची विक्री सुरू आहे. नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम सुरू केली आहे. कायद्याचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# अमरावतीत भव्य मतदान जनजागृती रॅली



## शंभर टक्के मतदानाचा संकल्प

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 )**- अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने शनिवारी (दि. 10 जानेवारी 2026) भव्य मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध व शांततेत यशस्वीरीत्या पार पडली.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित रॅलीचा प्रारंभ दुपारी 3 वाजता दसरा मैदान येथून झाला. दसरा मैदानङ्कराजापेठङ्कराजकमल चौक असा रॅलीचा मार्ग होता. लोकशाही प्रक्रियेत जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढावा व शंभर टक्के मतदानाचे उद्दिष्ट साध्य व्हावे, हा या रॅलीचा मुख्य हेतू होता. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी, उद्योजक, स्वयंसेवी संस्था व सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. 'मतदान हा अधिकार व कर्तव्य आहे', 'माझे मत ङ्क माझा अधिकार' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.रॅलीदरम्यान मतदान जनजागृती गाण्याचे लाँचिंग, 100 फूट तिरंगा, तिरंगी फुगे, पथनाट्य सादरीकरण व रथावरील जनजागृती कार्यक्रम नागरिकांचे विशेष आकर्षण ठरले. दिव्यांग बांधवांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.



राजकमल चौक येथे रॅलीची सांगता झाली. यावेळी कोणताही दबाव वा प्रलोभन न बाळगता निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. या रॅलीमुळे शहरात मतदानाबाबत जागरूकता वाढेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.

# ठाणे कुणाचे ? शिंदे की ठाकरे बंधुंचे

**महाराष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

गेल्या तीन दशकाहून अधिक काळ ठाणे शहर म्हणजे शिवसेना हेच समिकरण झाले आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे या शहरावर विलक्षण प्रेम होते. शिवसेनेला पहिला नगराध्यक्ष दिला तो ठाणे शहराने. मुंबई महापालिकेवर शिवसेनेने सलग पंचवीस वर्षे आपले वर्चस्व कायम ठेवले, तसेच ठाण्यावरही शिवसेनेने आपला प्रभाव कायम राखला आहे. धर्मवीर आनंद दिघे यांनी ठाणे जिल्हयात शिवसेना रूजवली व वाढवली. एक रिक्षावाला व आंदोलन करणारा सामान्य शिवसैनिक मुख्यमंत्रीपदापर्यंत पोचला व आता उपमुख्यमंत्री आहे तो म्हणजे ठाणेकर असलेले एकनाथ शिंदे. शिंदे यांचे नाव ठाण्यात घराघरात पोचलेले आहे. शिवसैनिकांची मोठी फौज व शाखांचे जाळे ही त्यांची शक्ति आहे. जून २०२२ मधे त्यांनी शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकवला आणि आपले भाजपाच्या आशीर्वादाने नेतृत्वगुण सिध्द करून दाखवले. नंतर राज्यातील भाजपाने शिंदे यांचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न केला पण मोदी-शहांशी थेट संबंध, राज्यात साठ आमदारांची ताकद आणि ठाण्यावर वर्चस्व यामुळे शिंदे हे सत्तासंघर्षात पाय भक्कम रोवून उभे आहेत. मुंबई आणि ठाण्यात आपलाच महापौर बसवायचा असा भाजपाचा मनसुबा आहे. मुंबईत भाजपाचा महापौर होणे शक्य आहे पण ठाण्यात शिंदेच्या शिवसेनेचा महापौर होऊ न देणे हे भाजपाला खूप कठीण आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आपले ठाणे, आपला देवाभाऊ याविषयावर ठाण्याच्या गडकरी रंगायतनमधे ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ व अभिनेत्री तेजश्री प्रधान यांनी मुलाखत घेतली. ठाण्यात स्वबळाचा आग्रह का सोडण्यात आला असा त्यांना थेट प्रश्न विचारण्यात आला. त्यावर फडणवीस म्हाले -

ठाण्यात शिवसेनेशी युती न करता पक्षाने स्वबळावर महापालिका लढवावी यासाठी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, शहराध्यक्ष संदीप लेले तसेच ठाण्यातील भाजपाचे बहुतांश पदाधिकारी व कार्यकर्त्यांची इच्छा होती. आपली ताकद वाढलेली आहे व आपण स्वबळावर अधिक नगरसेवक निवडून आणू शकतो असे सर्व जण सांगत होते. सध्याच्या राजकीय परिस्थितीत बाळासाहेब





ठाकरे यांची शिवसेना व तिचे नेतृत्व एकनाथ शिंदेंकडे असल्याने केवळ जागा वाटपाच्या कारणावरून वेगळे लढणे योग्य ठरणार नाही, वेगळे लढलो असतो तर कदाचित सत्ता मिळाली असती, पण त्यातून मनभेद व कटुता वाढली असती.

ठाणे हे बाळासाहेब ठाकरे यांचे आवडते शहर राहिलेले आहे , याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हाले, अशा शहरात युतीतील पक्षांत वाद विवाद व संघर्ष निर्माण होणे योग्य नाही. कमी जागा घ्यायच्या पण एकत्र लढायचं, असा स्पष्ट संदेश आपण दिल्यानंतर पक्षातील सर्वांनी स्वीकारला.

सन २०१७ मधे झालेल्या महापालिका निवडणुकीत ठाण्यातून अविभाजित शिवसेनेचे ६७ नगरसेवक निवडून आले होते. पैकी ६६ नगरसेवक हे एकनाथ शिंदे यांच्या नेतत्वाखालील शिवसेनेत आहेत. उध्दव ठाकरे व राज ठाकरे यांची संयुक्त सभा झाली तरी ठाकरे बंधुंवर ठाणेकरांचा विश्वास किती आहे, हे निवडणुकीनंतर सिध्द होणार आहे. शिवसेना ठाण्यात कुणाची आणि ठाणे कुणाचे या प्रश्नाचे उत्तर ठाणेकर पंधरा तारखेला देणार आहेत. शिंदे विरूध्द ठाकरे बंधु असाच सामना ठाण्यात बघायला मिळणार आहे.

१९८७ व १९९३ च्या दरम्यान काँग्रसची सत्ता वगळता ठाण्यावर शिवसेनेचेच वर्चस्व राहिलेले आहे. दिवंगत राज्यसभा खासदार सतीश प्रधान यांना शिवसेनेचे पहिले नगराध्यक्ष व पहिले महापौर म्हणून याच ठाणे नगरीने बहुमान दिला. ठाण्यात भाजपाबरोबर युतीमधे शिवसेनेने नेहमीच मोठ्या भावाची भूमिका बजावली आहे. सन २०१७ मधे राज्यात युती असुनही ठाण्यात महापालिकेची निवडणूक शिवसेना व भाजपाने स्वतंत्रपणे लढली होती. शिवसेनेने १३१ पैकी ६७ जागा जिंकल्या, राष्ट्रवादी काँग्रेसने ३४ तर भाजपाने २३ जागा जिंकल्या होत्या. तेव्हा भाजपा ठाण्यात तिसऱ्या क्रमांकावर होता. जून २०२२ च्या बंडानंतर राजकीय समिकरण बदलले. एक वगळता शिवसेनेचे सर्व नगरसेवक एकनाथ शिंदेंच्या पक्षात आले. यंदाच्या निवडणुकीत शिंदे यांच्या पक्षाचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, त्याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. एकनाथ शिंदे किंवा त्यांचे नेते, पदाधिकारी वा केडर अगदी मध्यरात्रीही लोकांच्या मदतीला धावून येते असा ठाणेकरांचा अनुभव आहे. ठाण्यातील शिवसेनेच्या शाखांवर रोज लोकांची गर्दी दिसते ही पक्षाची मोठी ठेव आहे.

ठाणे महापालिकेच्या १३१ जागांसाठी शिंदे यांची शिवसेना ८७ जागांवर लढत आहे. भाजपा ४० जागांवर व चार जागा अन्य मित्र पक्षांना दिल्या आहेत. महायुतीच्या विरोधात उबाठा सेना ५३, मनसे ३४, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) ३६ जागा लढवत आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ७५ जागी उमेदवार उभे केले आहेत. ठाण्यात काँग्रेस ९६ जागांवर स्वबळावर लढत आहे.

शिवसेनेच्या सर्व शाखा व माजी नगरसेवक शिंदेंच्या पक्षात आहेत. म्हणूनच उध्दव ठाकरे यांच्यासाठी काय उरले आहे ? राज आणि उध्दव एकत्र आले असले तरी संघटनात्मक जाळे विस्कळीत असल्याने त्यांना लाभ तरी किती मिळणार ? राष्ट्रवादी काँग्रेसची जी ताकदआहे ती मुंब्रा कळवा पुरती मर्यादीत आहे. जितेंद्र आव्हाड यांचे नेतृत्व व मुस्लिम मतदारांची पेढी ही राष्ट्रवादीची शक्ति आहे. ठाण्याला नागरी समस्यांनी वेढलेले आहे. वाहतुकीची कोंडी विशेषत: घोडबंदर रोडवर वाहनांची अफाट गर्दी, रोज होणारे अपघात, उंच टॉवर्सचा विळखा, वेगाने वाढत असलेली लोकसंख्या व अपुरा पाणी पुरवठा, अशा प्रश्नांनी ठाणेकरांना हैराण केले आहे. पर्याय नसल्याने देवाभाऊ आणि एकनाथभाई हेच ठाणेकरांचे आशास्थान आहे.

# कौतुकापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ

माझं कौतुक केलं नाही म्हणून नाराज होऊन एक जण त्याच्या सहकाऱ्याला सांगत होता. मी तेथून जात असताना मला आवाज देऊन बोलावले. चांगला परिचय असल्याने मी ही त्यांच्या गप्पात सामील झालो. सर याने चांगले काम केले आहे पण त्याच्या मित्राने कौतुक केले नाही म्हणून हा त्याच्यावर नाराज आहे. मी सांगितले पण हा त्यातून बाहेर पडत नाही. तुम्ही बोला याच्याशी म्हटल्यावर मला आता बोलणे भाग पडले.

मी त्यांच्याकडून सगळा वृत्तांत जाणून घेतला.

खरं तर माणूस हा कौतुकाचा भुकेलेला असतो. त्याला वाटते माझ्याकडून चांगले काम झाल्यावर माझे कौतुक व्हावे. परंतु कोणतेही काम करताना आपण नेहमी आपले कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून काम करावे. मग कौतुकाची अपेक्षा मनात येत नाही. आणि जर अशी अपेक्षा मनात निर्माण झाली तरी तुमचे कौतुक करायला समोरच्या व्यक्तीचे मन खूप मोठे व विशाल असावे लागते. तरच ती व्यक्ती तुमच्या चांगल्या कामाचे निर्मळ मनाने कौतुक करते. तुम्ही पुढे जाल म्हणून ती व्यक्ती कौतुक करत नसेल तर तुम्ही दुःखी होण्याचे कारण नसते. त्यातून समोरच्या व्यक्तीच्या विचारांची उंची लक्षात येते.

समोरचा माणूस कौतुक करत नाही म्हणून तुम्ही नाराज न होता आपले काम करत राहावे. आपल्या कामातून आपल्याला व इतरांना आनंद मिळत असेल तर तुम्ही कोणाकडून कौतुकाची अपेक्षा ठेवू नका.

समाजात अशी अनेक माणसं असतात जी निरपेक्ष भावनेने टीका सहन करुन आपले काम सचोटीने आणि प्रामाणिकपणे करत असतात. ती कोणाच्या टीकेने थांबत नाहीत आणि कौतुकाने हूरळून जात नाहीत. एकाग्रतेने आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी धडपडत असतात. कौतुकापेक्षा त्यांची आपल्या कामावर निष्ठा आणि अपार प्रेम असते. अशी माणसे स्वतः त्याग करुन इतरांसाठी काम करत असतात. कदाचित तुमच्या चांगल्या कामाबद्दल असूया, द्वेष, मत्सर असेल तर समोरची व्यक्ती तुमचे कौतुक करणार नाही म्हणून तुम्ही चांगले काम करायचे थांबवू शकत नाही.

कोणतेही काम करताना ते कधीही कौतुकासाठी करायचे नसते. आपली कामाप्रती असणारी बांधीलकी आणि निष्ठा म्हणून करायचे असते. तुमच्या कामामुळे इतरांचे हित साधले जाणार असेल, त्यांचा फायदा होणार असेल तर त्यातून मिळणारा आनंद कौतुकापेक्षा लाखपटीने मोठा असतो.

कोणी कौतुक करो अथवा टीका आपले काम तेवढ्याच तत्परतेने, तन्मयतेने आणि झोकून देऊन केले की कामाचे प्रचंड समाधान मिळते.

खरं तर कौतुकापेक्षा टीका करणारी माणसं जास्त असली पाहिजेत तरच तुम्ही त्वेषाने स्वतः ला सिद्ध करता. कामातून तुमचे अस्तित्व आणि सामर्थ्य दाखविता.

संकुचित वृत्तीच्या माणसांना दुसऱ्याचे कौतुक करता येत नाही. तेवढे त्यांचे मन आणि विचार प्रगल्भ नसतात. दुसऱ्याचे कौतुक केल्याने कोणतेच नुकसान होत नाही उलट तुम्ही त्या व्यक्तीचे कौतुक करुन एक प्रकारे त्याला प्रोत्साहित करत असता. त्याला बळ देत असता. नेहमी दुसऱ्यांच्या चांगल्या कामाचे दिलदारपणे कौतुक करावे हे एक चांगल्या आणि परिपक्व माणसाचे लक्षण आहे.

**लक्ष्मण जगताप,**
**बारामती**
**लेखक शिक्षक आहेत.**

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री



भारत मातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज पुण्यतिथी आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. पुण्यतिथीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

# मा. सुप्रीम कोर्टाच्या अनुसार लग्नानंतर स्त्रीधन वर सासरवाडी किंवा नवऱ्याचे हक्क असते का ?

गेल्या आठवड्यापासून आपण स्त्रीधन बद्दल माहिती घेत आहोत, जी नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणार आहे.

**प्रश्न : मा. सुप्रीम कोर्ट स्त्रीधन बद्दल काय म्हणाले ?**

श्रीमती प्रतिभा रानी विरुद्ध सुरजकुमार [1985] 155 ITR 190 (sc) या केस मध्ये मा.सुप्रीम कोर्ट यांनी स्पष्ट सांगितले की स्त्रीधन ही स्त्रीची 'Absolute Property'-आहे. यालाच परिपूर्ण मालमत्ता असे संबोधले जाते. या केसमध्ये प्रतिभा रानी यांना त्यांचे पती सुरजकुमार यांनी बायकोचे सर्व दागीने घेतले आणि तिला घराबाहेर काढून दिले. हे दागिने स्त्रीधन होते. या स्त्रीधन मध्ये ९ सोन्याचे सेट, एक हिऱ्यांचा सेट, सिंगार पेटी ज्यात सोन्याचा टीका, दोन बाजु बंध, तीन अंगठ्या, एक सोन्याची नथ, एक डझन सोन्याच्या बांगड्या एक सोन्याची चैन आणि दोन पाजेब (तोरडी) होते. पाजेबला सोप्या भाषेत आपण पाय किंवा घोट्यांवर घातलेला अलंकार किंवा पायल म्हणू शकतो. या केस मध्ये सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले की स्त्रीधन ही जॉइंट प्रॉपर्टी होऊ शकत नाही. ते धन जरी नवऱ्याकडे किंवा सासरवाल्यांकडे सोपलेले असले तरी ती एकत्र प्रॉपर्टी होणार नाही, ती स्त्रीधन च राहील. हे धन बँकेत पैसे ठेवल्यासारखे आहेत. स्त्रीला पाहिजे तेव्हा हे धन ती सासर वाल्यांकडून कधीही परत घेऊ शकते. इतकेच नाही तर मा. सुप्रीम कोर्ट असे ही म्हणाले की जर सासरवाल्यांनी हे परत दिले नाही तर ती स्त्री त्यांच्या विरुद्ध स्त्रीधन परत मिळविण्यासाठी सिविल सूट आणि क्रिमिनल सूट (फौजदारी केस) ही करू शकते. इतकेच नाही तर सुप्रीम कोर्टाने विनोदकुमार सेटी विरुद्ध पंजाब सरकार AIR 1982 P&H, 372 या निर्णयाविरुद्ध कडक ताशेरे ओढले.

**प्रश्न : वर बघितले की विनोदकुमार केस मध्ये पंजाब एक हरयाणा कोर्टवर सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढले याचे कारण काय होते ?**

विनोदकुमार विरुद्ध पंजाब राज्याविरुद्ध पंजाब K05 हरियाना उच्च न्यायालयाने नवऱ्याच्याबाजूने निर्णय दिला होता. यात हायकोर्टाने म्हंटले होते की लग्न झाल्या बरोबर स्त्रीधन ही प्रॉपर्टी स्त्री ची एकटीची राहत नाही. ती प्रॉपर्टी सासरवाडीची joint property (एकत्र) होऊन जाते. या मुळे सुप्रीम कोर्टाने कडक ताशेरे ओढले की हा निर्णय चुकीचा असुन स्त्रीधन ला सासरवाडी वाले हात लावू शकणार नाही.

पुढील आठवड्यात स्त्रीधन बद्दल नवीन माहिती बघणार आहोत, जी महिलांना खूप मार्गदर्शक राहील.

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

# मकरसंक्रांतीची भेट की लोकशाहीची परीक्षा ?



दिपक कैतके

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा धुरळा उडालेला असतानाच मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्येला सरकारकडून जाहीर झालेली लाडकी बहीण योजनेतील एकत्रित ३ हजार रुपयांची घोषणा केवळ उत्सवाची बातमी म्हणून पाहता येत नाही. ही घोषणा, तिची वेळ आणि तिचा प्रचारात्मक आविष्काराया साऱ्यांनी मिळून लोकशाहीच्या मैदानात एक गंभीर प्रश्न उभा केला आहे: हा लोककल्याणाचा नियमित निर्णय आहे, की मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांवर प्रभाव टाकण्याची रणनीती ? विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजना महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली गेली. दरमहा १,५०० रुपये थेट खात्यात जमा होणे, हा या योजनेचा गाभा. पैसे कधी द्यायचे, कसे द्यायचे, हप्ते वेगळे की एकत्रयाचा सर्वस्वी निर्णय सत्ताधारी सरकारकडे असतो, हेही तितकेच खरे. पण निवडणूक जाहीर असताना आणि मतदानाच्या उंबरठ्यावर ही वेळ ठरवली जाते, तेव्हा प्रश्न उद्भवतोआदर्श आचारसंहिता हा शब्द केवळ कागदोपत्री उरतो का ?

या पार्श्वभूमीवर भाजप मधील नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी केलेले ट्वीट विशेष लक्ष वेधून घेते. देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मकरसंक्रांतीची मोठी भेट १४ जानेवारीपूर्वी ३,००० रुपये खात्यात जमा, असा आशय आणि त्यासोबत मकरसंक्रांतीची मोठी भेट असा ठळक मजकूर असलेले पोस्टरहा केवळ माहितीपर निवेदनाचा प्रकार नव्हे, तर राजकीय संदेशाचा सणसणीत आविष्कार आहे. लाभार्थींना आनंद होणे स्वाभाविक; पण निवडणूक प्रक्रियेत अशी भाषा वापरणे कितपत योग्य, हा प्रश्न टाळता येत नाही.

आधी नोव्हेंबरडिसेंबरचे दोन हप्ते एकत्र येतील, अशी अपेक्षा होती; प्रत्यक्षात अनेकांच्या खात्यात फक्त १,५०० रुपयेच जमा झाले. त्यामुळे निर्माण झालेली नाराजी शमवण्यासाठी आता एकत्रित ३,००० रुपयांची घोषणा हा प्रशासनिक निर्णय आहे की राजकीय दुरुस्ती ? हाच गाभ्याचा मुद्दा आहे. लोकहिताच्या योजना सातत्याने, ठरलेल्या वेळापत्रकानुसार चालतात, तर निवडणूक-समयी उचललेले पाऊल हमखास संशयाच्या कक्षेत येते. याच काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचारात सक्रिय असून, जोपर्यंत देवाभाऊ आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही; आम्ही लाडक्या बहिणींना लखपती दीदी करू, असे ठाम विधान करतात. धोरणात्मक आश्वासने ही राजकारणाची अपरिहार्यता आहे; मात्र मतदानाच्या उंबरठ्यावर रोख रक्कम जमा होण्याची वेळ ही आश्वासनांपेक्षा अधिक परिणामकारक ठरते हेच तर विरोधकांचे म्हणणे आहे.

योजना चालू ठेवणे हा अधिकार सरकारचा असला, तरी मतदानाच्या आदल्या दिवशी पैसे टाकणे म्हणजे मतदारांवर थेट प्रभाव टाकण्याचा प्रयत्न नाही का ? हा सवाल साधा असला, तरी वजनदार आहे. आदर्श आचारसंहिता म्हणजे केवळ बॅनर, पोस्टर आणि सभांवरचे निर्बंध नव्हेत. मतदारांच्या निर्णयस्वातंत्र्याचे रक्षण हे तिचे मूळ तत्त्व. निवडणुकीच्या काळात सरकारी सत्तेचा वापर करून कोणताही थेट किंवा अप्रत्यक्ष लाभ देणे विशेषतः रोख स्वरूपात हे स्वातंत्र्य बाधित करते का, याचे उत्तर काळाने नाही, तर नियमांनी द्यायला हवे. म्हणूनच निवडणूक आयोगाची भूमिका येथे निर्णायक ठरते. आज या निर्णयाभोवती दोन विरुद्ध प्रतिक्रिया दिसतात. एकीकडे, घरखर्चात दिलासा मिळालेल्या महिलांचे समाधान; दुसरीकडे, लोकशाही मूल्ये पायदळी तुडवली जात असल्याचा आरोप. या दोहोंमधील ताणच तर निवडणुकीचे राजकारण ठरवतो. योजनांचा लाभ देणे आणि त्याचा प्रचार करणेया सीमारेषा पुसट झाल्या, की लोकांचा विश्वास झिजतो. मकरसंक्रांती ही गोडीचा सण. पण निवडणुकीच्या उंबरठ्यावर आलेली ही गोड भेट लोकशाहीसाठी चाचणी ठरत आहे. उद्या मतपेटीत उमटणारा कौल हा केवळ एका योजनेचा किंवा एका घोषणेचा नसेल; तो आदर्श आचारसंहिता, राजकीय नैतिकता आणि मतदारांच्या स्वातंत्र्यावरील विश्वासाचा असेल. सत्ताधाऱ्यांनी हा विश्वास कितपत जपला याचे उत्तर आता मतदारच देणार आहेत.

# लालबहादुर शास्त्री यांचा साधेपणा

सध्या राज्यातील अनेक प्रमुख जिल्ह्यांमध्ये महापालिका निवडणुकांची धूम आहे. निवडणुकीत उभे राहिलेले सर्वच उमेदवार जिंकून येण्याच्या आशेने कार्यकर्त्यांवर, प्रचाराच्या साधनांवर, सामाजिक माध्यमांवर पाण्यासारखा पैसा खर्च करत आहेत. हे पाहिल्यावर त्यांची ही तळमळ नक्की लोकसेवेसाठी आहे की निवडून आल्यावर सत्तेचा मलिदा लाटण्यासाठी, असा प्रश्न कोणालाही पडावा. देशाच्या स्वातंत्र्यानंतर निवडणूक प्रक्रिया, उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी आवश्यक पात्रता, प्रचाराच्या पद्धती, निवडून येण्यासाठी खेळले जाणारे डावपेच यांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले. यंदाच्या निवडणुकीत काही गोष्टी नव्याने घडल्या. विरोधात उभे राहिलेल्या काही उमेदवारांना कोट्यवधी रुपये देऊन खरेदी केले गेले, तर काहींना धमकावून उमेदवारी मागे घेण्याचे प्रकार घडले. बिनविरोध निवडणुकीचे नवे फॅड यंदा पाहायला मिळाले. आजच्या घडीला निवडणूक म्हटली की सर्व पैशांचा खेळ झाला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीला आपल्याला जे राज्यकर्ते लाभले ते मात्र स्वार्थी नव्हते. ना त्यांना पदाचा लोभ होता ना सत्तेची हाव ! त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि साधेपणाची उदाहरणे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी अभ्यासण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. या देशप्रेमी राजकीय नेत्यांपैकी एक असलेले लालबहादुर शास्त्री यांचा ११ जानेवारी हा स्मृतिदिन. लालबहादुर शास्त्री म्हणजे साधेपणा आणि महानतेची प्रतिकृती होते. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग प्रेरणादायी आहेत. ते देशाचे पंतप्रधान असतानाची गोष्ट आहे. एके दिवशी ते कापड गिरणी पाहण्यासाठी गेले. त्यांच्याबरोबर गिरणीचा मालक, उच्च अधिकारी व इतर महत्त्वाचे लोक होते. गिरणी पाहिल्यानंतर शास्त्रीजी गिरणीच्या गोदामात गेल्यानंतर त्यांनी साड्या दाखवायला सांगितले. गिरणी मालक आणि अधिकाऱ्याने एकापेक्षा एक सुंदर साड्या त्यांना दाखवल्या. शास्त्रीजी साड्या पाहून म्हणाले, साड्या तर खूप सुंदर आहेत, यांची किंमत काय आहे? ही साडी ८०० रूपयांची आहे आणि हिची किंमत एक हजार रुपये आहे, गिरणी मालकाने सांगितले. ही तर खूप महाग आहे, मला कमी किमतीच्या साड्या दाखवा, शास्त्रीजी म्हणाले. ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट होती की ही घटना १९६५ ची होती, यावेळी एक हजार रुपयांची किंमत खूप होती. बरं, ही पाहा. ही साडी पाचशे रुपयांची आहे आणि ही चारशे रुपयांची, गिरणी मालक दुसऱ्या साड्या दाखवत म्हणाला. अरे बाबा, यादेखील खूप महाग आहेत. माझ्यासारख्या गरीबासाठी कमी किमतीच्या साड्या दाखवा, ज्या मी खरेदी करू शकेल, शास्त्रीजी म्हणाले. वा सरकार, आपण तर आमचे पंतप्रधान आहात, तुम्हाला गरीब कसे म्हणता येईल ? आम्ही तर या साड्या तुम्हाला भेट देत आहोत, गिरणी मालक बोलला. नाही बाबा, मी भेट घेऊ शकत नाही, शास्त्रीजी म्हणाले. यावर तो गिरणी मालक अधिकाराने म्हणाला की, आम्ही आमच्या पंतप्रधानांना भेट देणे, हा आमचा अधिकार आहे. हो, मी पंतप्रधान आहे, शास्त्रीजी शांतपणे म्हणाले. परंतु, याचा अर्थ असा नाही की ज्या वस्तू मी खरेदी करू शकत नाही त्या वस्तू मी भेट म्हणून स्वीकारू आणि आपल्या पत्नीला देऊ. मी पंतप्रधान असलो तरी आहे गरीबच ना ! तुम्ही मला स्वस्त साड्याच दाखवा. मी ऐपतीप्रमाणेच साडी खरेदी करेन. गिरणी मालकाच्या साऱ्या विनवण्या व्यर्थ गेल्या. देशाच्या पंतप्रधानांनी स्वस्त भावाच्या साड्याच खरेदी केल्या. शास्त्रीजी एवढे महान होते की मोह त्यांना स्पर्शही करू शकत नव्हता.

शास्त्रीजी गृहमंत्री असताना तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना काश्मीर येथील बैठकीस जाण्यास सांगितले त्यावर त्यांनी त्यांच्याकडे थंड प्रदेशात घालायचे गरम कपडे नसल्याने जाण्यास अनिच्छा दर्शवली, त्यानंतर नेहरू यांनी स्वतःचा कोट शास्त्रीजींनी देऊ केला. पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरही शास्त्रीजींकडे त्यांच्या मालकीची चारचाकी गाडी नव्हती. या पदावर असतानाच त्यांनी गाडी खरेदी करण्यासाठी कर्ज काढले. या कर्जाचे हप्ते त्यांनी पंतप्रधान काळात आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने फेडले. याउलट आजच्या स्थितीचा विचार केल्यास साध्या महापालिकेच्या निवडणुकीत विजयी होऊन नगरसेवक बनलेल्याकडे पाच वर्षांत गाडी बंगल्यासह अनेक सुखसुविधा पायाशी लोळण घेऊ लागतात. पुढच्या किमान दोन पिढ्या बसून खातील एव्हढा बक्कळ पैसा तिजोरीत जमा होतो. हा भेद नेमके काय दर्शवतो ? आजमितीला पक्षातून अधिकृत तिकीट मिळण्यासाठी उमेदवाराला पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासावे लागतात. तिकीट मिळाल्यावर प्रचारासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात त्यामुळे निवडून आल्यानंतर खर्च केलेला पैसा वसूल करण्यात आणि भविष्यासाठी आपली आणि कुटुंबीयांची व्यवस्था करण्यात काही वर्षे निघून जातात. एकूणच ज्याच्याकडे बक्कळ पैसा आहे असाच उमेदवार निवडणूक लढवू शकतो आणि जिंकून येऊ शकतो हे समीकरण निश्चित झाले आहे. त्यामुळे शास्त्रीजींसारखे साधे आणि प्रामाणिक लोकनेते येणाऱ्या पिढीला केवळ इतिहासातच वाचायला मिळतील हे निश्चित !



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

# मानवी तस्करी : आधुनिक गुलामगिरीविरुद्ध माणुसकीचा लढा

दरवर्षी ११ जानेवारी रोजी साजरा होणारा राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिन हा केवळ एखादा स्मरणदिन नसून तो समाजाच्या सामूहिक अंतरात्म्याला जागे करणारा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क यांची मूल्ये जपत पुढे चालणाऱ्या आधुनिक जगात आजही लाखो स्त्री-पुरुषआणि मुले खरेदी-विक्रीच्या वस्तूसारखी वागवली जातात, ही बाब आपल्या सामाजिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. मानवी तस्करी ही काही गुन्हेगारांची विकृती नसून ती दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी, स्थलांतर, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली खोलवर रुजलेली सामाजिक समस्या आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी स्वरूपात न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

मानवी तस्करी म्हणजे एखाद्या व्यक्तीला फसवणूक, आमिष, धमकी, दबाव किंवा हिंसेच्या माध्यमातून तिच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन तिच्याकडून शोषणात्मक काम करून घेणे. हे शोषण लैंगिक असू शकते, जबरदस्तीची मजुरी असू शकते, घरगुती गुलामगिरी, बालमजुरी, भीक मागणे, अवयव विक्री किंवा सक्तीच्या विवाहाच्या स्वरूपातही ते आढळते. या प्रक्रियेत माणसाचे स्वातंत्र्य, ओळख आणि मानवी प्रतिष्ठा पूर्णपणे नष्ट होते. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ज्या समाजात सत्ता, संसाधने आणि संधी काही मोजक्या गटांकडे केंद्रीत असतात, तिथे दुर्बल घटकांचे शोषण अपरिहार्यपणे वाढते आणि मानवी तस्करीसारख्या अमानवी प्रथा बळावतात.

भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग, लिंग आणि प्रदेश यांच्या आधारे विभागलेली आहे. या विषम सामाजिक रचनेमुळे अनेकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या समान संधी मिळत नाहीत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीतील अनिश्चित उत्पन्न, आदिवासी भागातील विकासाचा अभाव आणि शहरी झोपडपट्ट्यांतील असुरक्षित जीवन यामुळे लाखो लोक रोजीरोटीच्या शोधात स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या प्रवासातच दलाल आणि तस्कर गरीब व असहाय लोकांना चांगल्या नोकरीचे, शिक्षणाचे किंवा सुरक्षित आयुष्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढतात. विशेषतः महिला, मुले, आदिवासी आणि स्थलांतरित कामगार यांच्याकडे माहिती, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक पाठबळ कमी असल्याने ते अधिक असुरक्षित ठरतात.

स्त्री आणि मुलींची तस्करी ही मानवी तस्करीचे सर्वात क्रूर रूप मानले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीच्या शरीराकडे आणि श्रमाकडे वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती अजूनही खोलवर रुजलेली आहे. याच मानसिकतेतून लैंगिक तस्करीला खतपाणी मिळते. अनेक मुली प्रेमजाळे, खोटी लग्ने, नोकरीचे आमिष किंवा थेट अपहरणाद्वारे वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात. त्यांच्या आयुष्यावर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर खोल जखमा उमटतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही केवळ काही गुन्हेगारांची कृत्ये नसून स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सांस्कृतिक रचनेचे अपयश आहे.

बाल तस्करी ही तर समाजाच्या नैतिक अधःपतनाची परिसीमा आहे. शिक्षण, संरक्षण आणि प्रेमाचा हक्क असलेल्या मुलांना बालमजुरी, भीक मागणे, घरगुती कामे किंवा लैंगिक शोषणासाठी वापरले जाते. अनेक वेळा अत्यंत गरीब कुटुंबेही आपल्या असहायतेमुळे दलालांच्या फसवणुकीला बळी पडतात. समाजशास्त्र सांगते की मुलांचे शोषण हे सामाजिक सुरक्षा जाळ्याच्या अपयशाचे द्योतक आहे. जेव्हा राज्य आणि समाज कुटुंबांना मूलभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा मुले तस्करीच्या जाळ्यात अडकतात.

कामगार तस्करी आणि जबरदस्तीच्या श्रमांची समस्या ही आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेची काळी बाजू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार कर्ज, आमिष किंवा फसवणुकीमुळे गुलामासारखे राबवले जातात. वीटभट्ट्या, बांधकाम, शेती, कारखाने आणि घरगुती कामांमध्ये त्यांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. जागतिकीकरणामुळे स्वस्त श्रमांची मागणी वाढली असून त्याचा फायदा तस्कर घेतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे आर्थिक विषमतेचे आणि कामगारांच्या दुर्बलतेचे द्योतक आहे.

डिजिटल युगात मानवी तस्करीचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन जाहिराती आणि बनावट भरती संस्थांच्या माध्यमातून तरुणांना नोकरी, मॉडेलिंग किंवा परदेशी शिक्षणाचे आमिष दाखवले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे आज जागरूकता ही केवळ भौतिक जगापुरती मर्यादित न राहता डिजिटल अवकाशातही तितकीच महत्त्वाची आहे. माहितीची असमानता आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर हे नव्या प्रकारच्या सामाजिक शोषणाचे माध्यम ठरत आहेत.

भारतात मानवी तस्करीविरोधात कायदे आणि योजना अस्तित्वात असल्या तरी अंमलबजावणीतील त्रुटी मोठे आव्हान ठरतात. पोलिस, न्यायव्यवस्था आणि सामाजिक संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव, तसेच पीडितांविषयी असलेला सामाजिक कलंक, पुनर्वसनाच्या प्रक्रियेला अडथळा आणतो. तस्करीतून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा स्वीकार मिळणे कठीण जाते, आणि त्यामुळे अनेकदा ते पुन्हा शोषणाच्या चक्रात अडकतात.

या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिनाचे महत्त्व अधिक ठळक होते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी प्रतिष्ठेचे रक्षण ही केवळ सरकारची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. गरिबी निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि कामगार हक्कांचे संरक्षण ही मानवी तस्करीविरोधातील सर्वात प्रभावी साधने आहेत. शाळा, महाविद्यालये, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था यांनी या विषयावर सातत्याने जनजागृती करणे आवश्यक आहे. समाजशास्त्र आपल्याला शिकवते की मानवी तस्करी ही वेगळी समस्या नसून ती आपल्या सामाजिक रचनेतील दोषांचे प्रतिबिंब आहे. म्हणून तिचे उच्चाटन करायचे असेल तर आपल्याला अधिक समतावादी, संवेदनशील आणि न्याय्य समाज घडवावा लागेल. ११ जानेवारी हा दिवस आपल्याला केवळ जागरूक करत नाही, तर कृतीसाठी प्रेरित करतो. कारण ज्या समाजात माणूस माल म्हणून विकला जातो, त्या समाजात कोणाच्याही स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. मानवी तस्करीविरुद्धची लढाई म्हणजे माणुसकीच्या रक्षणाची लढाई आहे, आणि ती आपणा सर्वांची आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

# नॉयलॉन मांजाविरोधात ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

## विक्री, साठवणूक व वापरावर बंदी ■ पाच ठिकाणी छापे, हजारोंचा प्रतिबंधित माल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 )**– नॉयलॉन व सिंथेटिक मांजामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने त्याच्या विक्री, साठवणूक व वापरावर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने 9 जानेवारी 2026 रोजी अमरावती ग्रामीण पोलिसांनी विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत धडक कारवाई करत प्रतिबंधित नॉयलॉन मांजाचा मोठा साठा जप्त केला.

दर्यापूर येथे नंदु भगवान बुंदेले याच्याकडून 122 रिल्स (किंमत सुमारे 4 हजार), चांदूर बाजार येथे मो. मुजम्मील शरीफ याच्याकडून 221 रिल्स (13,800 रुपये), परतवाडा येथे अलकेश अग्रवाल याच्याकडून 15 रिल्स (9 हजार रुपये), तसेच बालाजी पतंग सेंटर, पेन्शनपुरा येथे अजय पन्नालाल गुप्ता याच्याकडून 7 रिल्स (7 हजार रुपये) असा प्रतिबंधित मांजा जप्त करण्यात आला. याशिवाय अंजनगाव सुर्जी येथे अ. माजीद मो. शरीफ याच्याकडून 22 रिल्स (13 हजार रुपये) किमतीचा माल हस्तगत करण्यात आला. सर्व आरोपींविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यांत भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नॉयलॉन मांजा वापरामुळे गंभीर अपघात होऊ शकतात, तसेच अशा प्रकरणांचा निकाल सत्र न्यायालयात चालतो, त्यामुळे नागरिकांनी स्वत: व आपल्या पाल्यांना यापासून दूर ठेवावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.



### परतवाडा विशेष कारवाई

पेन्शनपुरा, परतवाडा येथे स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून 07 नॉयलॉन मांजा चकी व 57 सिंथेटिक मांजा चकी असा सुमारे 41,200 रुपयांचा माल जप्त केला. अजय पन्नालाल गुप्ता व कमलेश मोहनलाल गुप्ता या दोघांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला.



# डीजी लोनला मंजुरी, मात्र पैसा खात्यात कधी?

## निधी वितरणास विलंब, पोलिस कर्मचाऱ्यांत अस्वस्थता

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 10 )** – राज्याची कायदा-सुव्यवस्था अहोरात्र सांभाळणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. तब्बल दोन वर्षांपासून ठप्प असलेल्या डीजी लोन (गृहबांधणी अग्रिम) योजनेस राज्य शासनाने नोव्हेंबर महिन्यात 1,768.08 कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देत हिरवा कंदील दाखवला. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असले, तरी प्रत्यक्ष निधी वितरणास विलंब होत असल्याने मंजुरी झाली, पण पैसा खात्यात कधी? हा प्रश्न कायम आहे.

सन 2023-24 आणि 2024-25 या आर्थिक वर्षात 5 हजारांहून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांनी डीजी लोनसाठी अर्ज केले होते. निधीअभावी हे प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. निधी मंजुरीची घोषणा होऊन दोन महिने उलटले तरी वितरण प्रक्रिया सुरू न झाल्याने पोलिस कर्मचाऱ्यांत संभ्रम व अस्वस्थता वाढत आहे.

डीजी लोन बंद असल्यामुळे अनेक कर्मचारी आजही कुटुंबासह भाड्याच्या घरात राहतात. काहींनी फ्लॅट बुक केले, तर काहींचे घरबांधकाम निधीअभावी अर्ध्यावर थांबले आहे.

वाढती महागाई, घरभाडे आणि बँकांचे कठोर कर्जनियम यामुळे त्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. डीजी लोनची पुनर्बहाली मोठा दिलासा देणारी असली, तरी निधी वितरणातील विलंबामुळे आनंदावर विरजण पडले आहे. मंजुरी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील दरी दूर करून शासनाने तातडीने निधी वितरित करावा, अशी जोरदार मागणी पोलिस कर्मचाऱ्यांकडून होत आहे.



### खाकीधारींचे हक्काचे घर

पोलिस कर्मचाऱ्यांना स्वत:चे घर असणे ही गरज आहे. डीजी लोनमुळे हे स्वप्न पूर्ण होऊ शकते, मात्र निधी वितरणाचा वेग वाढवणे आवश्यक आहे.

### काय आहे डीजी लोन?

डीजी लोन ही कायमस्वरूपी पोलिस कर्मचाऱ्यांसाठीची गृहबांधणी अग्रिम योजना असून घर बांधकाम, फ्लॅट खरेदी किंवा विस्तारासाठी सुलभ अटींवर कर्ज दिले जाते.

### मंजुरी झाली, पण उत्तर बाकी!

1,768 कोटींची मंजुरी झाली असली, तरी निधी वितरणास विलंब झाल्याने पोलिस कर्मचाऱ्यांत नाराजी वाढत आहे.

# मेळघाटात उच्च शिक्षणाचा संदेश घेऊन एकलव्य शिक्षण यात्रेची सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.10 )** – आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी एकलव्य इंडिया फाउंडेशनतर्फे 'एकलव्य मेळघाट शिक्षण यात्रा' सुरू करण्यात आली आहे. या यात्रेची सुरुवात पोस्ट बेसिक आश्रमशाळा, हरिसाल येथून झाली. या उपक्रमांतर्गत 12 प्रमुख आश्रमशाळा, सुमारे 1200 किलोमीटरचा प्रवास आणि 120 हून अधिक गावांचा दौरा करून अंदाजे 1200 विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाचा संदेश पोहोचविण्यात येणार आहे.




महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या परवानगीने हा उपक्रम राबविण्यात येत असून, चाचणी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये CUET, MHCET, TISS, APU अशा प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन समाविष्ट आहे. कार्यक्रमात व्यसनमुक्ती, बालविवाह रोखणे, शिक्षणातील सातत्य आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्यात आला. विविध तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी व करिअर निवडीबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे मेळघाटातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशाच्या संधी मिळतील, अशी आशा व्यक्त होत आहे.

# कुंभार समाजाकडून नवनियुक्त तहसीलदारांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि.10 )**– अचलपूर तहसीलचे नवनियुक्त तहसीलदार सुदर्शन सहारे यांचा कुंभार समाज संघटनेच्या वतीने शिष्टमंडळाद्वारे औपचारिक सत्कार करण्यात आला. त्यांच्या नवनियुक्तीबद्दल शुभेच्छा देत प्रशासन व समाज यांच्यात समन्वयाने काम करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या वेळी धनराज प्रजापती, राजेश प्रजापती, सतीश धोंडे, अल्लू यांच्यासह कुंभार समाज संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाकडून योग्य सहकार्य मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तहसीलदार सहारे यांनीही समाजाच्या समस्या समजून घेऊन योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

# वीजचोरीविरोधी कारवाई की केवळ दिखावा?

## ■ महावितरणचे पथक ओळखपत्रांशिवाय
## ■ नियमांनाच हरताळ, नागरिकांत संताप




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.10 )** – तालुक्यात 8 जानेवारी रोजी वीजचोरीविरोधात कारवाईसाठी महावितरणचे पथक शहर व ग्रामीण भागात फिरताना दिसले. मात्र ही कारवाई प्रभावी ठरण्याऐवजी पथकातील कर्मचाऱ्यांच्या बेफिकिरीमुळे वादग्रस्त ठरली आहे. कारण, बहुतांश कर्मचारी व अधिकारी ओळखपत्रांशिवायच गावोगावी फिरत होते. त्यामुळे ही कारवाई अधिकृत आहे की केवळ कागदोपत्री दाखवण्यासाठीचा दिखावा, असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

महावितरणच्या नियमानुसार तपासणी किंवा वीजचोरीविरोधी कारवाईदरम्यान सर्व कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र गळ्यात परिधान करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात आले. काही वरिष्ठ अधिकारी ओळखपत्रासह होते, मात्र चांदूर बाजार कार्यालयातील अभियंते व संबंधित कर्मचारी ओळखपत्राविना फिरत असल्याचे चित्र दिसून आले.

अनेक ठिकाणी ग्रामस्थांनी ओळखपत्राबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. परिणामी 'वीजचोरी कारवाईच्या नावाखाली सहलीसारखा फेरफटका' अशी चर्चा सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार काही ठिकाणी केवळ संशयावरून मीटर काढून नवीन मीटर बसवण्यात आले, मात्र प्रत्यक्ष चोरी आढळून आली नाही.

सामान्य ग्राहकांवर दंड व कारवाईचा धाक दाखवणारी यंत्रणा स्वत: नियम पायदळी तुडवत असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा महावितरणची विश्वासार्हता आणखी डळमळीत होईल, अशी तीव्र प्रतिक्रिया तालुक्यातून उमटत आहे.

# 'हे राम' हा गांधींच्या वैश्वीक विचाराचा सार आहे



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 )** – गांधींच्या आयुष्यातील विविध प्रसंग आणि घटनांमध्ये मला एक स्वतंत्र कविता भेटत गेली. त्यामुळं %हे राम% हा काव्यसंग्रह गांधींच्या वैश्विक विचाराचा सार असल्याचं प्रतिपादन कवी तथा लेखक गजानन इंदुशंकर देशमुख यांनी केले. त्यांच्या हे राम पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

**गजानन इंदुशंकर देशमुख**

येथील अभियंता भवन येथे युवा संवाद प्रतिष्ठानं आयोजित केलेल्या प्रकाशन सोहळ्यात पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध वक्ते आनंद शितोळे, अहिल्यानगर यांचे हस्ते संपन्न झाले. प्रसिद्ध लेखक चंद्रकांत वानखडे यांची प्रस्तावना व सुरेश व्दादशीवार यांच्या शुभेच्छा सदर पुस्तकाला प्राप्त झाल्या असून पुणे येथील हर्मिस प्रकाशनानं ते प्रकाशित केलं. मोजक्या शब्दात गांधी समजून देण्याची ताकद या पुस्तकात असल्याची प्रतिक्रिया याप्रसंगी शितोळे यांनी आपल्या व्याख्यानातून दिली. कार्यक्रमाचे संचलन अभिजित पडोळे याने तर आभार प्रदर्शन संदीप देशमुख यांनी केले. प्रा. प्रशांत विघे यांनी पुस्तकाविषयी विवेचन केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# चिखलदऱ्याला विकासाचा नवा अध्याय प्रारंभ

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांचा पदग्रहण सोहळा





**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.10 )** – चिखलदरा नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांचा पदग्रहण समारंभ नगरपरिषद प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यास शेकडो नागरिकांसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार राजकुमार पाटील, माजी आमदार वीरेंद्र जगताप, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह महेंद्रसिंह गहेलवाल, रोहित पटेल, पंकज मोरे, सहदेव बेलकर, राहुल येवले, शेख झहीर, नासिर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात नवनिर्वाचित नगराध्यक्षांचे स्वागत केले.

### जनशक्तीचा विजय – खासदार बळवंत वानखडे

खासदार बळवंत वानखडे म्हणाले, चिखलदऱ्यात नागरिकांनी धनशक्तीला नाकारत जनशक्तीचा विजय घडवून आणला आहे. पाणीपुरवठा, रस्ते व पर्यटन विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू. नागरिकांनी दाखवलेला विश्वास कधीही डळमळीत होऊ देणार नाही. चिखलदऱ्यात सत्ता आल्यानंतरचा आनंद अवर्णनीय आहे.

### शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय – नगराध्यक्ष

नवनिर्वाचित नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर म्हणाले, चिखलदऱ्यातील जनतेने माझ्यावर टाकलेला विश्वास माझ्यासाठी जबाबदारी आहे. शहराचा आणि नागरिकांचा सर्वांगीण विकास करणे हेच माझे प्रथम कर्तव्य असून आजपासून त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. चिखलदऱ्यातील सर्व नागरिकांचा मी सदैव ऋणी आहे.

# धान्य मंजुरीअभावी गरजवंतांची तहसीलमध्ये फरफट

## कोटा संपल्याने नवीन रेशनकार्डधारकांना अन्नधान्य मिळेना

## 502 प्राधान्य व 97 अंत्योदय अर्ज प्रलंबित

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, ( दि.10 )**– राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतून रेशनकार्डधारकांना दरमहा मोफत अन्नधान्य पुरवले जाते. मात्र नांदगाव खंडेश्वर तहसीलमध्ये पुरवठा विभागाचा धान्य कोटा (इस्टांक) संपल्याने नवीन रेशनकार्डधारकांना धान्य मंजुरी थांबविण्यात आली आहे. त्यामुळे गरीब व गरजू कुटुंबांना अन्नधान्यासाठी तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.



तहसील कार्यालयातील पुरवठा विभागामार्फत पात्र कुटुंबांना प्राधान्य व अंत्योदय गटात रेशनकार्ड दिली जातात. प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती पाच किलो धान्य, तर अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा 35 किलो धान्य मिळते. केंद्र सरकारने ही योजना 2029 पर्यंत वाढविल्याने लाभार्थ्यांची संख्या वाढली आहे. मात्र त्या तुलनेत धान्याचा कोटा वाढलेला नसल्याने समस्या गंभीर झाली आहे.

मागील मे-जून महिन्यापासून धान्य कोटा संपल्याची माहिती असून, त्यामुळे नवीन लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट करणे तसेच जुन्या रेशनकार्डमध्ये नावे समाविष्ट करणे शक्य होत नाही. उज्ज्वला गॅस कनेक्शन, लाडली बहीण योजना यांचा लाभ सुरू राहावा यासाठी अनेक कुटुंबांनी नवीन एनपीएच विभक्त रेशनकार्ड काढले आहेत. परंतु कोटाअभावी त्यांना धान्य मिळत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे.

पुरवठा विभागाच्या माहितीनुसार प्राधान्य योजनेसाठी 502 तर अंत्योदय योजनेसाठी 97 अर्ज प्रलंबित आहेत. अन्नधान्याच्या प्रतीक्षेत असलेले नागरिक दररोज तहसील कार्यालयात येत असले तरी कोटा उपलब्ध नसल्याने त्यांची निराशा होत आहे. प्रशासनाने तातडीने अतिरिक्त धान्य कोटा मंजूर करून गरजवंतांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

> मी भूमिहीन लाभार्थी असून नवीन रेशनकार्ड काढले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह रोजंदारीवर अवलंबून आहे. तहसीलमध्ये वारंवार येङ्कजा करण्याचा खर्च परवडत नाही. शासनाने लवकरात लवकर धान्य पुरवठा सुरू करावा.
>
> **फरजाना बानो, समद खान, रा. ढवलसरी, ता. नांदगाव खंडेश्वर.**

# जगदंब पब्लिक स्कूलतर्फे चांदूर बाजार तालुक्यातील पत्रकारांचा गौरव

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.10 )** – येथील जगदंब पब्लिक स्कूलच्या वतीने चांदूर बाजार तालुक्यातील पत्रकारांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांनी नेहमी सत्याच्या बाजूने उभे राहत निर्भीड व जबाबदार पत्रकारिता करावी, असे प्रतिपादन जगदंब पब्लिक स्कूलचे अध्यक्ष विनोद कोरडे यांनी यावेळी केले.



पत्रकार हे समाजाचा आरसा असून लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील चांगल्या-वाईट बाबी प्रामाणिकपणे मांडून जनतेला योग्य दिशा देण्याचे कार्य पत्रकार करत असल्याचेही कोरडे यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय देशमुख यांनी केले. यावेळी शिक्षक बँकेचे माजी संचालक प्रमोद ठाकरे, बेलोरा ग्रामपंचायतीचे सरपंच भैया कडू, गोपाल भालेराव, दत्ता किटू कले, संतोष पोहोकर, सतीश गुजरकर, विनोद बंड, गजानन ठाकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अमोल लंगोटे, मनीष एकलारे, रमण लंगोटे, शरद ताक आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अरुण कुलथे, राजाभाऊ देशमुख व मदन भाटे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच साहेबराव खडसे, एजाज खान, माजीद इकबाल, सुयोग गोरले, शशिकांत निचत, किशोर मेटे, करण खंडारे, गौतम खंडारे, गजानन ढवळे, सागर सावळे, शरद केदार, प्रताप गवई, सचिन वानखडे आदी पत्रकारांचा यावेळी गौरव करण्यात आला

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# भक्तिमार्ग






## ध्यास घ्यावा गोडव्याचा

• जाणून घ्या •

संक्रांत साजरी करताना ही गोडी वरवरची असू नये याची काळजी घ्यायला हवी. वृत्तीतील गोडवा वाढवणं हाच समाजपटलावर घडणाऱ्या नानाविध कटू घटनांवरचा उतारा असू शकतो. केवळ एक दिवसच नव्हे तर कायमस्वरुपी कृती, उक्ती आणि प्रवृत्तीत गोडी भरली तरच परस्परांच्या साह्याने संपन्न होणारी जीवनयात्रा सफल होऊ शकते. जाणीवपूर्वक सामाजिक वैर पसरवलं जाण्याच्या या काळात प्रत्येकानेच हे भान राखायला हवं.

दरवर्षीप्रमाणे यंदादेखील संक्रात उत्साह आणि आनंदात साजरी होत आहे. समस्त भारतवासियांसाठी हा सण महत्त्वाचा असतो. मुळातच गोडीकडे आकृष्ट होणं हा माणसाचा स्वभाव आहे. संक्रांत या स्वभावाला, वृत्तीला साद घालते. गतवर्षातील कटू आठवणींवर उतारा शोधण्याचा हा एक सांस्कृतिक आणि समंजस मार्ग आहे. त्यामुळे शक्य असेल तर त्यांना तिळगुळ देऊन गोड बोलण्याचं साकडं घालत आणि अन्यांना शुभेच्छा–सदिच्छांमार्फत संदेशाची देवाणघेवाण करत तो साजरा होतो. पूर्वी टपालाच्या बंद पाकिटातील दोन–चार हलव्याच्या दाण्यासवे या शुभेच्छा पोहोचायच्या, आता समाज माध्यमांद्वारे पोहोचतात. शब्दांना लोंबणारे भावनांचे घोस फेसबुकची वॉल रंगवून टाकतात. व्हॉट्स ॲपवरील विविध ग्रुप्सवर हीच गोडी पसरत राहते. जणू काही समाजपुरुषाच्या जिभेवरील ही गोडी कधी हटणारच नाही असं वाटू लागतं. चंद्रकळेवरील खडीसारख्या मनातील आशा चमकू लागतात. पण दिवस सरतो आणि ही आशाही... पहिले पाढे पंचावन्न म्हणत नवा दिवस उगवतो आणि आदल्या दिवशीची मिठास कुठल्या कुठे गायब होते.

दरवेळी हे असंच होतं. मागच्या वर्षीही गोडी सदैव टिकावी हीच इच्छा व्यक्त करुन संक्रांत साजरी झाली होती. मग असे किती गोड प्रसंग बघायला मिळाले आपल्याला? किती सकारात्मकता दिसली समाजमनात? या प्रश्नांची उत्तर अर्थातच तोंड कडू करणारी आहेत. आजची सामाजिक परिस्थिती कोणत्याही विवेकशील व्यक्तीला भावनाशून्यतेकडे नेणारी आहे असंही म्हणता येईल. म्हणूनच एकीकडे सणाच्या साजरीकरणाची सिद्धता करताना आपण बळजोरीने चेहऱ्यावर भावनांचे लेप चढवतोय की काय असं वाटून जातं. कारण एखादी घटनाही ही पुटं हटवून समाजाची दांभिकता दाखवून देण्यास पुरेशी असते हे आपण जाणतो. तिळगुळाचा गोड मुलामा निघून जातो आणि कटू वास्तव बाहेर पडतं. हेच तर दिसलं वर्षभरातील घटनाक्रमांमधून... २०१७ चं स्वागत करतानाही दिसेल त्याच्या हातात हात गुंफून, आनंदाने चित्कार करत आपण नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. शांततेचं प्रतीक म्हणून रंगीबेरंगी फुगे आकाशात झेपावले होते. डीजेतालावर नाच रंगले होते. पण त्यानंतर काय? वर्ष गाजलं ते आंदोलनांनी, निदर्शनांनी, एकमेकांवर केलेल्या पातळीहीन आरोपांनी... वर्षभर शिमगाच साजरा केला काही वाचळवीरांनी... दरवर्षी तेच होत राहतं. बदलतात ती केवळ वर्षं... ही आंदोलनं कधी जातीपातीतील संघर्षातून होतात, कधी आरक्षणाचा मुद्दा समोर असतो, कधी एखाद्या हत्याकांडाच्या निषेधार्थ जनता रस्त्यावर उतरते तर कधी आपल्या मागण्यांसाठी ठराविक व्यावसायिक रस्त्यावर उतरुन समाजाला वेठीस धरतात. अशा एक ना दोन अनेक घटना वर्षातील कित्येक दिवस बरबाद करत असतात. जनसामान्यांचं जीवन कठीणप्राय बनवत असतात. कुठे चक्काजाम तर कुठे रेल रोको. कधी काम बंद तर कधी अमक्यातमक्या संघटनेचं संपाचं आवाहन. या असंतोषाच्या सादरीकरणाला, अभिव्यक्तीला कधी हिंसाचाराचं गालबोट लागेल सांगता येत नाही. कधी एखादा दगड येईल आणि डोक्याचा वेध घेईल, कधी एखादा जमाव लाठ्याकाठ्या घेऊन गराडा घालेल, कधी कुठे अडकून पडल्याने जीव टांगणीला लागेल काहीच सांगता येत नाही. सार्वत्रिक सुखाच्या–आनंदाच्या प्रसंगी एकमेकांची जात–धर्म–पंथ न विचारता उद्घोष करणारे हेच चेहरे आपापल्या संरक्षित वर्तुळात असतात तेव्हा मात्र भयावह हिंस्त्र रूप धारण करतात. मग त्यांना घाबरत आपलं आडनाव उच्चारायचं की नाही, या आडनावासह मत मांडायला गेलो तर परिणाम काय होतील याचा मनातल्या मनात विचार करायचा आणि दिवाभितासारखं जगत रहायचं एवढंच आपल्या हाती उरतं. अशाच पद्धतीने जीव मुठीत घेऊन



आला दिवस साजरा झाला याचं समाधान मानायचं आणि जिवंतपणी घरी परतलो याचा आनंद व्यक्त करत उद्याच्या आव्हानांना सामोरं जाण्याची शक्ती मिळवण्यासाठी तनामनाला विश्रांती देणारी झोप घ्यायची याला कोणी जगणं म्हणायचं तर म्हणो बापडे, पण अशा आयुष्यात काही अर्थ नाही. याने अभिसरण, वाटचाल, विकास, गतीमानता या समाजचक्रास कार्यान्वित ठेवणाऱ्या, पुढे नेणाऱ्या क्रिया घडणं शक्य नाही. जागच्या जागी थयथयाट करत पुढे जात असल्याच्या वल्गना करण्यासारखं आहे हे!

खरं तर गोड ही सर्वप्रिय चव आणि गोडवा शोधणं, त्याकडे आकृष्ट होणं हा मानवी स्वभाव आहे. गोडवा फक्त पदार्थांमध्येच नसतो तर स्वभावात असतो, व्यक्तिमत्त्वात असतो, कलाछंदांमध्ये असतो, निसर्गसानिध्यात असतो , शांतता आणि सौहार्दपूर्णतेत असतो. म्हणूनच हे वैशिष्ट्य असणाऱ्या ठिकाणी गुळाला मुंगळे चिकटावेत तशी माणसं चिकटतात. विचार आचारातील ही गोडी सर्वदूर पसरत राहते आणि एक विवेकशील आभा अनेकांना आपल्यात सामावून घेते. मात्र सध्या ही प्रक्रियादेखील तितकी निर्मळ आणि पारदर्शक राहिलेली नाही. कोणाच्या व्यक्तिमत्त्वातील गोडी केवळ आपल्या समाजात वाटण्यापुरती मर्यादित असते तर कोणाच्या कृती आणि उक्तीत वरकरणी दिसणारा गोडवा अनेकांना आपल्या मायाजालात ओढण्यासाठी आणलेला फसवा आभास असतो. विशिष्ट्य लाभापोटी जिभेवर साखर घोळवत अनेकांना फशी पाडायचं आणि स्वार्थ साधून नंतर त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचं ही नतद्रष्टता मिरवणारा एक मोठा वर्ग सध्या कार्यरत आहे. सद्गुरु, गुरु, महाराज आदी नावांखाली गोड बोलून अनेकांना आपल्या लिंगपिसाट आणि स्वार्थी प्रवृत्तीच्या जाळ्यात ओढणारे कमी नाहीत. एखाद्याकडून काही ओरबडून घेतानाही सुरुवातीला याच गोडीचा, वाणीतील गोडव्याचा आधार घेतला जातो. म्हणूनच आजच्या गोडीतही भेसळ आहे असं म्हणावं लागेल. ती शुद्ध, सात्विक राहिलेली नाही. अशी फसवी गोडी ओळखणं आणि त्यापासून चार नव्हे तर दहा हात दूर राहणं हेदेखील संक्रांतीच्या निमित्ताने साधायला हवं.



## तुलना करू नका

• आत्मबोध •

आपल्यातले अनेक जण स्वत:ची, आयुष्याची तुलना इतरांशी करतात. ही तुलनाच आपल्या दु:खाला कारणीभूत ठरते. एका कथेतून ही संकल्पना समजून घेऊया.

एक कावळा आयुष्यात समाधानी होता. पण एके दिवशी त्याने पांढरंशुभ्र बदक पाहिलं. हे बदक किती पांढरंशुभ्र आहे आणि मी काळा आहे असा विचार त्याच्या मनात आला. हे बदक खूप आनंदी असेल असं कावळ्याला वाटलं. मग कावळ्याने याबाबत बदकाला विचारलं. तू जगातला सर्वात सुखी पक्षी आहेस ना, असा प्रश्न त्याला कावळ्याने केला. त्यावर बदक म्हणालं की, मी दोन रंगाच्या पोपटाला बघितलं होतं. तो खूपच सुंदर होता. त्याला बघेपर्यंत मलाही असंच वाटायचं की मी जगातला सर्वात समाधानी पक्षी आहे. मग ते दोघं पोपटाकडे गेले. मोराला बघेपर्यंत मी आनंदी होतो. पण मोर माझ्यापेक्षा सुंदर आहे. माझ्या शरीरावर तर दोनच रंग आहेत. पण मोर रंगीबेरंगी आहे, असं उत्तर पोपटाने दिलं.

मग कावळा मोराकडे गेला. हा मोर प्राणीसंग्रहालयातल्या पिंजऱ्यात होता. तू खूप सुंदर आहेस. लोक तुला बघायला येतात. तू जगातला सर्वात समाधानी पक्षी आहेस ना, असा प्रश्न त्याने मोराला केला. त्यावर मोर म्हणाला की, याच सौंदर्यामुळे तर मी या पिंजऱ्यात अडकून पडलो आहे. मी संपूर्ण प्राणीसंग्रहालयाचं निरिक्षण केलं. मला कुठेही कावळा दिसला नाही. त्यावेळी माझ्या मनात आलं की मी कावळा असतो तर मलाही मुक्तपणे वावरता आलं असतं. प्रत्येक जण आपापल्या आयुष्यात दु:खी असतो. त्यामुळे आपल्या आयुष्याची इतरांशी तुलना न करता जे आहे ते स्वीकारायला हवं.



## ...तर होईल यशप्राप्ती

• स्वमदत •

यश या शब्दाची व्याख्या व्यक्तिगणिक बदलत जाते. आयुष्यातली ध्येय गाठणं, उद्दीष्ट पूर्ण करणं म्हणजे काहींसाठी यश असू शकतं. तर एखाद्यासाठी साध्याशा क्रीडा स्पर्धेतल्या विजयापुरती यशाची संकल्पना मर्यादित असू शकते. आपलं जीवन अनंत अडचणी आणि अडथळ्यांनी भरलेलं आहे. त्यामुळे सर्व क्षमतेनिशी मैदानात उतरून प्रयत्न करत राहणं ही यशस्वी होण्याची गुरूकिल्ली ठरू शकते. अर्थात यश मिळवण्यासाठी स्वभावात, मानसिकतेत काही बदल करावे लागतात. त्याविषयी...

* नकारात्मकता सोडून इच्छाशक्ती वाढवायला हवी. काही सवयींमुळे यश हुलकावणी देत आहे का, हे आपण लक्षात घ्यायला हवं. तसं असेल तर या सवयी सोडून द्यायल्या हव्या.

* आरोग्यदायी जीवनशैली अवलंबवा. आहाराच्या चुकीच्या सवयी, सतत बसून राहणं या गोष्टी सोडून द्या. व्यायामाची सवय लावा. तेलकट पदार्थ वर्ज्य करा. आरोग्य उत्तम असेल तर आपण आयुष्यात काहीही साध्य करू शकतो

* प्रत्येक व्यक्तीला आणि गोष्टीला होकार देऊ नका. अवघडलेपणामुळे आपण नकार देऊ शकत नाही. यामुळे यश आपल्यापासून लांब जाऊ शकतं. त्यामुळे नकाराला आपलं सामर्थ्य बनवा.

* विशिष्ट मानसिकतेतून बाहेर पडा. ही मानसिकता तुम्हाला पुढे जाऊ देत नाही. नव्या गोष्टी शिका. नव्या आव्हानांचा सामना करा.

* एकाच वेळी विविध गोष्टी हाताळू नका. सर्वगुणसंपन्न होण्याचा प्रयत्न करू नका. आयुष्याचं एकमेव उद्दीष्ट ठरवा आणि ते साध्य करण्याचा प्रयत्न करा.

* कोणतीही कारणं देऊ नका. अपयश आलं तरी घाबरून जाऊ नका. सतत रडत बसू नका.

* प्रत्येक परिस्थितीवर आपलं नियंत्रण हवं असा अट्टाहास बाळगू नका.

* या जगात कोणीही सर्वोत्तम नाही. त्यामुळे तुम्हीही तसे होऊ शकणार नाही, हे लक्षात घ्या. त्यामुळे सर्वोत्तम होण्याचा ध्यास सोडून द्या.

* मोठी स्वप्न बघा. एखादी गोष्ट आपल्याला जमणार नाही, असा विचार सोडून द्या.



## संघर्षातही सौख्य राखा

• स्वसाह्य •

जीवन जगताना संघर्ष अटळ आहे. अनेक लोक हा संघर्ष करतच जगत असतात. त्यांना बऱ्याच अडचणींना समोरं जावं लागतं. जन्माला आलो आहोत म्हणून जगायचं तर असतं. पण अशा लोकांच्या आयुष्यात सुख आणि समाधान नावालाही नसतं. आयुष्य सुखासमाधानाने घालवण्यासाठी काही गोष्टींकडे लक्ष देणं गरजेचं असतं. यामुळे दैनंदिन आयुष्यासोबतच अडचणीच्या काळातही आनंद मिळतो.

* प्रत्येक माणसासोबत प्रेमाने वागा. उच्चनीच असा भेदभाव करू नका. प्रत्येकाला मान–सन्मान द्या.

* प्रत्येक वेळी परिस्थिती बदलता येतेच असं नाही. त्यामुळे त्याच्यामागे फार लागू नका. काही गोष्टी बदलताना चांगल्या गोष्टी बिघडू शकतात. त्यामुळे परिस्थिती बदलण्याच्या मागे फार लागू नका.

* स्वत:साठी वेळ काढा. स्वत:च्या गरजांना प्राधान्य द्यायला शिका.

* भविष्याबद्दल फार विचार करू नका. वर्तमानात जगा. छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवा.

*वाईट गोष्टींचा फार विचार करत बसू नका. मानसिक त्रास करू घेऊ नका.

*नकारात्मक विचारांच्या लोकांपासून लांब राहा. अशा लोकांना जवळ येऊ देऊ नका.

*चांगले विचार मांडा. इतरांनाही चांगल्या गोष्टींची शिकवण द्या. प्रत्येक परिस्थितीची सकारात्मक बाजू बघा.

## छोट्या बदलामुळे...

• शिकवण •

आयुष्यात अडचणींचे अनेक प्रसंग येतात. या अडचणी दूर करण्यासाठी काय करता येईल याचा विचार आपण करतो. योग्य तो मार्ग निवडतो. पण अनेकदा मन विचलित होतं. काहीतरी मोठं केल्याशिवाय जीवन सुधारणार नाही, असं वाटत राहतं. असं असलं तरी प्रत्येक वेळी काहीतरी मोठं करणंच गरजेचं असतं असं नाही. छोटासा बदलही बरंच काही करू शकतो. एका कथेतून आपण हे जाणून घेऊया.

एक मुलगा भल्या पहाटे व्यायाम म्हणून धावायला जात असे. यावेळी त्याला एक वृद्ध महिला दिसे. ही महिला तलावातल्या छोट्या छोट्या कासवांची पाठ स्वच्छ करत असे. हे बघून मुलाला आश्चर्य वाटत असे. यामागचं कारण जाणून घ्यायचं त्याने ठरवलं. त्याने त्या महिलेला यामागचं कारण विचारलं. ती म्हणली की, मुला या कासवांची पाठ स्वच्छ केल्याने मला समाधान मिळतं. कवचाच्या वरच्या भागात कचरा जमा झाल्याने उष्णता निर्माण करण्याची त्यांची क्षमता कमी होते. यामुळे त्यांना पोहता येत नाही. तसंच कचरा साठल्याने कवचाचंही बरंच नुकसान होतं. त्यामुळे मी हे काम करते. त्यावर तो म्हणाला की, तुमचं कार्य खूप चांगलं आहे. पण यांच्यापेक्षाही वाईट अवस्थेतली कासवं आहेत. त्यांच्यासाठी तुम्ही काही करू शकत नाही. तुमच्या एकटीच्या प्रयत्नांमुळे फार मोठं काही घडणार नाही. कासवांचा बचाव होणार नाही. मग तुम्ही हे का करता? या प्रश्नावर महिलेने स्मितहास्य केलं. ती म्हणाली की, माझ्या कार्याचा आवाका खूप कमी असला तरी यामुळे किमान एका कासवाच्या आयुष्यात तर बदल घडणार आहे. माझ्यासारखे काही लोक असं कार्य करत असतील. मग आपणही छोटं का होईना पण पाऊल पुढे टाकायला हवं. हेच पाऊल पुढे खूप मोठे बदल घडवू शकतं.



## शिकवण विदुराची


• स्वमदत •

विदुराने अनेक गोष्टी सांगून ठेवल्या आहेत. बरेच सल्लेही दिले आहेत. विदुराची वचनं, जीवनमूल्यं आजच्या काळातही लागू पडतात. विदुराने सांगितलेल्या मार्गावर चालल्याने आयुष्यात यश मिळू शकतं. काही श्लोकांमधून त्याने जीवनाचे धडे दिले आहेत. हे श्लोक आणि त्याचा अर्थ जाणून घेऊन आपणही बऱ्याच गोष्टी शिकू शकतो.

* एकं हन्यान्न वा हन्यादिषुर्मुक्तो धनुष्माता।। बुद्धिर्बुद्धिम तोत्सुष्टा हन्याद राष्ट्रम सराजकम। याचा अर्थ असा की एखाद्या धनुर्धर योद्ध्याने मारलेल्या बाणामुळे कोणाचा मृत्यू होवो अथवा न होवो पण बुद्धीमान माणसाने बुद्धीचा चुकीचा वापर केला तर नगराच्या राजासोबतच संपूर्ण राष्ट्राचा विनाश होऊ शकतो.

* अनाहूत: प्रविशति अपृष्टो बहु भाषते। अविश्वस्ते विश्वसिती मूढचेता नराधम:।। म्हणजे मूर्ख मनुष्य न परवानगीशिवाय आत येतो. परवानगीशिवायच बोलू लागतो. तसंच विश्वासाला पात्र नसलेल्या माणसांवरही विश्वास ठेवतो.

* त्रिविधं नरकस्येदं द्वारम। नाशनमात्मन:। काम: क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्र त्यजेत।। याचा अर्थ असा की काम, क्रोध आणि लोभ हे आत्म्याचा नाश करणाऱ्या नरकाचे तीन दरवाजे आहेत. त्यामुळे या तिन्हींचा त्याग करायला हवा.



# बंडखोरांपासून भाजपला वाचवा हा नवीन नारा

## आमदार विजय वडेट्टीवार यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १० : भाजपच्या बंडखोर उमेदवारांना मुख्यालयात बोलावून पोलीस अधिकाऱ्यांनी समज दिल्याचा विषय मतदारांमध्ये चांगलाच चर्चेत आहे. काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनीही भाजपची या महानगरात काय अवस्था झाली आहे. भाजपची काय इज्जत राहिली आहे. भाजप आपल्या बडखोरांना समजू शकत नाही म्हणून आता पोलिसांना तंबी देण्यास सांगाव लागते आहे. पोलिसांनी भाजपला वाचवावे ही वेळ या पक्षावर आली आहे. बंडखोर पासून भाजपला वाचवा हा नवीन नारा महाराष्ट्रात दिला पाहिजे अशी टीका आमदार वडेट्टीवार यांनी केली.



भाजप बंडखोरांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभा व रॅलीत गोंधळ घातल्याने पोलिसांनी भाजप बंडखोर उमेदवारांना पोलीस मुख्यालयात बोलावून समज दिली. त्यामुळे मतदारांमध्ये एक वेगळाच संदेश गेला आहे.

बंडखोर ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने भाजप नेते आता पोलीसांचीही मदत घेत आहेत असेही वडेट्टीवार म्हणाले. राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्याची टीकाही वडेट्टीवार यांनी केली. हे सत्तेसाठी आहे की कार्यकर्त्यांसाठी आहे, की वैचारिक एकमत झाले का? दोघांचा जाहीरनामा एकत्र आला म्हणजे एकत्र आले आहेत. रोहित पवार मंत्रिमंडळात असतील, सुप्रिया सुळे केंद्रीय मंत्रिमंडळात असतील अशी चर्चा आहे. राष्ट्रवादी भूमिका बदलते ते सत्तेशिवाय राहू शकत नाही. ते सत्तेतून बाहेर पडले तर पक्ष संपेल. आम्हाला सत्ता महत्वाची नाही आम्हाला संविधान लोकशाही महत्वाची आहे त्यातही राहुल गांधी जी लढत आहे, आम्हीही लढू असेही वडेट्टीवार म्हणाले.

सत्तेत सहभागी पक्षातील नेते एकमेकांवर आरोप करणे म्हणजे ही नूर कुस्ती आहे. आता भांडतात उद्या सत्तेतून बाहेर पडणार का? शिंदे मराठी मतविभाजनाठी आहे अजित पवार हे पुरोगामी मत विभाजन साठी आहे. यांचा वापर मतविभाजन करण्यासाठी वापरले जात आहे. ठाकरे आणि काँग्रेस पक्ष कमकुवत करण्यासाठी सुरू आहे.निवडणुकीत कोण कुणाबरोबर गेले हे तात्पुरतं आहे.नंतर एकत्र सत्तेचा मलिदा खातील असाही आरोप वडेट्टीवार यांनी यावेळी केला.

भाजपचे नेते माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी रामकथेचे आयोजन केले आहे. रामकथा ऐकली पाहिजे. मन शुद्धीसाठी रामकथेत मदत करेल, भागवत सप्ताह केलं तर पापमुक्ती होईल असेही वडेट्टीवार म्हणाले.

## दगडाने ठेचून महिलेची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १० : महिलेच्या हत्या प्रकरणामुळे वाशीम शहर हादरले आहे. वाशीम शहरातील रेल्वेस्थानक परिसरातील विश्राम कक्षाजवळ अज्ञात महिलेची दगडाने ठेचून हत्या झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी समोर आली. अर्धनग्न अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला महिलेचा मृतदेह आढळून आला. महिलेवर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची चर्चा आहे. या प्रकरणी वाशीम शहर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेमुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली.

वाशीम शहरातील रेल्वेस्थानकाजवळ एक महिला बेशुद्ध अवस्थेत पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस पथकाने घटनास्थळावर धाव घेतली. पाहणी करताना विश्राम कक्षासमोरील संरक्षण भिंतीजवळ अंदाजे ४५ वर्षे वयाच्या महिलेचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह आढळून आला. महिलेच्या शरीरावर गंभीर जखमा असून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे दिसून आले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला.

या प्रकरणी वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुण नागरे पुढील तपास करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह अन्य पुरावे गोळा केले जात आहेत. या घटनेमुळे वाशीम शहर चांगलेच हादरले आहे.

आरोपीने महिलेवर अत्याचार करून पुरावा मिळू नये, यासाठी ही हत्या केल्याची चर्चा आहे. दरम्यान, वाशीम शहर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि रेल्वे पोलीस घटनेचा तपास करीत असून मृत महिलेच्या हातावर छाया मोहन असे नाव आहे. ही मृत महिला बाहेर जिल्ह्याची असल्याची प्राथमिक माहिती आहे.

महिलेचा मृतदेह रेल्वेस्थानक परिसरात असल्याच्या माहितीवरून पथकाने घटनास्थळ गाठले. उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला. मृतदेह अर्धनग्न अवस्थेत होता. उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतर मृत्युचे नेमके कारण व अत्याचार झाला की नाही? हे स्पष्ट होईल, असे वाशीम शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी सांगितले.

## हत्येनंतर मृतदेह पोत्यात बांधून बंधाऱ्यात फेकला

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० : उमरखेड तालुक्यातील ढाणकी शहरालगतच्या मुरली बंधाऱ्याच्या परिसरात पोत्यात बांधलेल्या अवस्थेत अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळला. खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पाण्यात फेकला असावा, असा संशय व्यक्त होत आहे. शुक्रवारी उघडकीस आलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मुरली येथील ग्रामस्थ बंधाऱ्याच्या बाजूने जात असताना त्यांना दुर्गंधी येऊ लागली. त्यामुळे परिसरात पाहणी केली असता, बंधाऱ्याच्या दरवाजाला पाण्यावर एक पोते दोरीने घट्ट बांधलेल्या अवस्थेत दिसले. नागरिकांनी तातडीने याची माहिती मुरली गावचे पोलीस पाटील मिथुन राठोड यांना दिली. पोलीस पाटील मिथुन राठोड यांनी बिटरगाव ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर, काही वेळातच पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, शिपाई दत्ता कवडेकर, प्रवीण जाधव हे घटनास्थळी पोहोचले.

पंचनामा करून ते पोते उघडण्यात आले, तेव्हा त्यात अंदाजे ३० ते ३२ वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला. या अज्ञात इसमाचा अंदाजे १० दिवसांपूर्वी खून करून मृतदेह नदीपात्रात फेकून देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतदेह फारीत गुंडाळून असल्याने आणि त्यावर काही खुणा असल्याने, हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह येथे टाकण्यात आल्याचा संशय आहे. पोलिसांनी मृतदेहाचे शवविच्छेदन नदीकाठावरच केले. यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. हांडे यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते.

पोलीस आता परिसरातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी करत आहेत, तसेच मुरली बंधाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून या अज्ञात इसमाची ओळख पटवून आरोपींच्या मुसक्या आवळू, असे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी सांगितले. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी भेट देऊन पाहणी केली. अनैतिक किंवा प्रेम संबंधातून तरुणाची हत्या करून मृतदेह फेकून देण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मंदिरातील बंद खोलीत ३७ वाघांच्या कातड्यांचा साठा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० : देशभरात बहेलिया शिकाऱ्यांनी वाघांच्या शिकारीचे जाळे पसरवले असताना आणि बावरियांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर वाघांच्या अवयवांच्या विक्रीचा घाट घातला असताना आता एका मंदिरातील बंद खोलीत ३७ वाघांच्या कातड्यांचा साठा सापडल्याने खळबळ उडाली आहे. केवळ ३७ वाघांच्या कातड्यांचा साठाच नाही तर सोबत १३३ नखेही आढळून आली आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा देशभरात बहेलिया शिकाऱ्यांचे संकट तर घोंगावत नाही ना, अशी भीती निर्माण झाली आहे.

गुजरातच्या नर्मदा जिल्ह्यातील राजपीपळा शहरात एका मंदिराच्या आवारात असलेल्या, आणि अवघ्या दोन आठवड्यांपूर्वीपर्यंत एका ९० वर्षीय काळजीवाहकाच्या ताब्यात असलेल्या एका सामान्य खोलीत वन्यजीव अवयवांचा मोठा साठा सापडला, ज्यामुळे सुरुवातीला वन विभागाचे कर्मचारी गोंधळून गेले आणि मोठ्या प्रमाणावर शिकारीचा संशय निर्माण झाला.



पाडण्यासाठी निश्चित केलेल्या त्या खोलीच्या झडतीमध्ये, एका लोखंडी पेटीत ३७ वाघांची कातडी आणि १३३ नखे भरलेली आढळली. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नंतर सांगितले की, हे सर्व बनावट असल्याचे दिसत असून, त्यांना मूळ वाटावे यासाठी रंगवले होते. मंदिराच्या आवारातील ही खोली गेल्या अनेक वर्षांपासून ९० वर्षीय माधवानंद नावाच्या काळजीवाहकाच्या ताब्यात होती. सुमारे दोन आठवड्यांपूर्वी त्यांचे निधन झाल्यानंतर मंदिर व्यवस्थापनाने ती खोली पाडून नवीन बांधकाम करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी या खोलीतील लोखंडी पेटीतून तब्बल ३७ वाघांच्या कातडे आणि १३३ नखे आढळून आली. तसेच काही दातही सापडल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

माधवानंद कधीही कोणालाही त्यांच्या खोलीत येऊ देत नव्हते. त्यांच्या निधनानंतर, मंदिर व्यवस्थापनाने त्या खोलीच्या जागेवर नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. तेव्हाच व्यवस्थापनाला ती कातडी, नखे आणि सुळे सापडले, असे एका वन अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेनंतर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर शिकारीचा संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र प्राथमिक चाचण्यांमध्ये ही कातडी खरी नसून रंग लावून खऱ्यासारखी भासवण्यात आल्याचे दिसून आले आहे.

# नवोदयच्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १० : लातूर जिल्ह्यातील काटा (ता. औसा) येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या वसतिगृहात इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या निरागस अनुष्का पाटोळे (वय १२) हिचा ३ जानेवारी रोजी रात्री झालेला संशयास्पद मृत्यू संपूर्ण समाजमनाला हादरवून सोडणारा आहे.

हा मृत्यू हत्या की आत्महत्या, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या प्रकरणातील सत्य बाहेर यावे व दोषींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच अनुष्काला न्याय मिळावा, या मागणीसाठी चिखली तालुक्यातील सकल मातंग समाजातर्फे कॅन्डल मार्च काढण्यात आला. काल शुक्रवारी रात्री चिखलीत काढण्यात आलेल्या या कॅन्डल मार्चमध्ये महिला व पुरुष नागरिक हातात मेणबत्त्या घेऊन सहभागी झाले. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.

चिखली शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कॅन्डल मार्चची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सम्राट अशोक, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना वंदन करण्यात आले. पोलीस लाईन, सिंधी कॉलनी चौक, अंजली टॉकीज मार्गे हा मार्च पुढे जात फुले शाहू आंबेडकर चौक येथे समारोप झाला.



चिखलीत मातंग समाजाचा कॅन्डल मार्च

अशोका वाटिका येथे झालेल्या समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. ज्येष्ठ नेते कैलास खंडारे यांनी अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सरकारला दिला. युवा नेते भाई छोटू कांबळे यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली.

यप्रसंगी राजीव जाधव, गवई , मिलिंद मघाडे, प्रवीण कांबळे, सचिन कांबळे, किरण बोरकर, योगेश साळवे, विलास घोरपडे, विलास निकाळजे आदी मान्यवरांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. हा कॅन्डल मार्च शांत, शिस्तबद्ध व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला.

# तरुणीवर पाशवी अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० : नात्याला काळिमा फासणारी आणि माणुसकीला लाजवणारी एक खळबळजनक घटना यवतमाळमध्ये समोर आली आहे. ज्याच्यासोबत आयुष्य घालवण्याचे स्वप्न पाहिले, त्या होणाऱ्या पतीने लग्नाआधीच तरुणीवर दोनवेळा बलात्कार केला. धक्कादायक म्हणजे, अत्याचार करूनही मन भरलं नाही म्हणून सात लाख रुपयांच्या हुंड्यासाठी या नराधमाने लग्न मोडल्याची संतापजनक घटना घडली आहे.

यवतमाळमधील एका सुशिक्षित तरुणीचे लग्न छत्रपती संभाजीनगर येथील लोकेश राजेंद्र तोनगिरे (२७) याच्याशी ठरले होते. मोठ्या उत्साहात यवतमाळात साखरपुडाही पार पडला. लग्नाची तयारी सुरू असतानाच तरुणीच्या घरी सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती. या पूजेसाठी लोकेश यवतमाळला आला. मात्र, घरात कोणीही नसल्याची संधी साधून त्याने आपल्या होणाऱ्या पत्नीवरच जबरदस्तीने पाशवी अत्याचार केला. त्यानंतर एका प्रवासादरम्यानही त्याने पुन्हा तरुणीवर बलात्कार केल्याचा गंभीर आरोप पीडितेने केला आहे.

पीडितेच्या कुटुंबाने साखरपुड्यासाठी आधीच चार लाख रुपये खर्च केले होते. त्यानंतर लग्नासाठी सात लाख रुपये हुंडा देण्याचे ठरले होते. पीडितेच्या आईने ही रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याची विनंती केली. मात्र, लोकेश आणि त्याच्या नातेवाईकांनी, सात लाख रुपये आताच द्या, अन्यथा लग्न मोडू, अशी धमकी दिली. परिस्थितीमुळे हतबल असणाऱ्या आई-वडिलांची विनंती धुडकावून लावत त्यांनी थेट लग्न मोडल्याचे जाहीर केले.

पीडितेने या छळाला कंटाळून अखेर न्यायासाठी लोहारा पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी मुख्य आरोपी लोकेश तोनगिरे याच्यासह हुंड्याची मागणी करून लग्न मोडणाऱ्या मयूर राजेंद्र तोनगिरे, सौरभ मयूर तोनगिरे, मोहिनी राजेंद्र तोनगिरे, अर्चना संदीप तोनगिरे, संदीप भाऊलाल तोनगिरे, मनीष जीवनालाल यांच्यावर गुन्हे दाखल केले असून पोलीस या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत. लग्न ठरल्यानंतर होणाऱ्या पत्नीवर अत्याचार करून हुंड्यासाठी तरुणीचे आयुष्य उद्धवस्त करणाऱ्या या टोळीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी होत आहे.

## लग्नाच्या दोन दिवसांपूर्वीच तरूणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १० : अवघ्या दोन दिवसांवर लग्न येऊन ठेपले असताना, एका रस्ता अपघाताने तरुणाचे आयुष्य संपवल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.



भंडारा-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पिपरी (पुनर्वसन) जवळील कवडसी फाट्यापाशी घडला. या घटनेमुळे ठाणा आणि पिपरी परिसरात शोककळा पसरली असून लांजेवार कुटुंबाचे स्वप्न अधुरे राहिले आहे.

ठाणा पेट्रोल पंप (ता. भंडारा) येथील आंबेडकर वॉडातील रहिवासी दुर्गेश किशोर लांजेवार (वय ३३) याचा विवाह ११ जानेवारी २०२६ रोजी निश्चित झाला होता. गावातीलच एका युवतीशी त्याचे लग्न होणार असल्याने घरात आनंदाचे वातावरण होते आणि लग्नाची लगबग सुरू होती. काही कामासाठी दुर्गेश पिपरी (पुनर्वसन) जवळील कवडसी फाट्यापाशी गेला होता. पायवाटेने रस्ता ओलांडत असताना भंडाराकडून नागपूरकडे जाणाऱ्या एका भरधाव ट्रकने (क्रमांक एम.एच.१४ एल.एक्स.४२१९) त्याला जोरदार धडक दिली.

ट्रक चालकाने वाहन भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवल्याने ही भीषण धडक बसली. या अपघातात दुर्गेशच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी गर्दी जमली होती. दुर्गेश हा कुटुंबातील कर्ता पुरुष असल्याने त्याच्या निधनाने लांजेवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मी भारतातील प्रेयसी

## मात्र प्रेम करणे महागात पडेल : खा. असदुद्दीन ओवैसी




■ महासागर प्रतिनिधी अकोला, दि. १० : केवळ मुस्लिमांवरच नाही, तर हिंदू, दलित नागरिकांवरही अन्याय होतात. जाती-धर्म पाहून नव्हे तर मनुष्यावरील अन्यायाविरोधात बोलत राहणार आहे. पहलगाम हल्ल्यात क्रूर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदू बांधवांवर हल्ला केला, त्यावेळी सर्वप्रथम आम्हीच खडेबोल सुनावले. भारतीय नागरिकांवर हल्ला झाला होता, ते पाकिस्तानातून आलेले दहतवादी होते. भारतीयांवर अन्याय कदापी सहन करणार नाही. काँग्रेसला केवळ निवडणुकीतच मतदानासाठी नागरिकांची आठवण येते, अशी टीका एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी आज येथे केली.

अकोला महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार असदुद्दीन ओवैसी यांची जाहीर प्रचार सभा शनिवारी झाली. यावेळी ते बोलत होते. उमेदवारांसह पक्षाचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. महापालिका निवडणुकीच्या प्रचारात अकोल्यात ओवैसी यांची ही दुसरी सभा झाली. एआयएमआयएमने अकोल्यात ३७ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवून काँग्रेसपुढे मोठे आव्हान निर्माण केले आहे. सभेमध्ये खा. ओवैसी यांनी सत्ताधाऱ्यांसह विरोधकांवरही जोरदार टीका केली.

पुढे ते म्हणाले, अडचणी व दंगलीच्या काळात काँग्रेसवाले कधी आले का? आता निवडणुका आले तर खा. ओवैसीवर टीका करीत फिरत आहेत. मी भारतातील प्रियसी असून सर्वांचेच माझ्यावरच प्रेम आहे. मात्र, हे प्रेम करणे महागात पडेल. गरीबांसाठी प्राण देणाऱ्यांपैकी मी आहे. जाती, धर्मावर नव्हे, तर कोणत्या हिंदुवर अन्याय झाला, तरी ओवैसी बोलणार आहे. दलितवर झाला, तर बोलत होतो, बोलत राहणार. अन्याय हा अन्यायच असतो. अन्याय फक्त मुस्लिमांवर झाला म्हणून अन्याय नाही, कोणत्याही मुनष्यावर अन्याय झाला, तर तो अन्यायच आहे.

खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांना लक्ष्य केले. ते म्हणाले, त्यांना वापस पाठवण्याची तयारी करीत आहे. मैदानमध्ये बसलो तर कठीण होईल. काँग्रेसचे कोणते पहेलवाल आहेत? २०२३ मध्ये दंगल झाले, तर काँग्रेसचे सर्व पहेलवाल पळून गेले होते. त्यावेळी काँग्रेसचे नेते कुठेच दिसून आले नाही. आता तेच काँग्रेसचे नेते मतांची भिक मागत फिरत आहेत. त्यावेळी आमच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी भेटी देऊन संकटातील नागरिकांना दिलासा दिला होता.

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेसाठी अमरावतीच्या तिघांची निवड

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १० : भारतीय तिरंदाजीच्या नकाशावर अमरावतीने आपले नाव पुन्हा एकदा सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. कोलकाता येथे पार पडलेल्या खुल्या निवड चाचणीत अमरावतीच्या तीन तिरंदाजांनी भारतीय संघात स्थान मिळवून नवा इतिहास रचला आहे. मधुरा धामणगावकर पाठोपाठ यशदीप भोगे आणि अवघ्या १६ वर्षीय कुमकुम मोहोडची जागतिक चषक (स्टेज १ आणि २) स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.



केवळ १६ वर्षीय कुमकुम मोहोड हिने रिकर्व्ह प्रकारातील निवड चाचणीत १३.५ गुणांसह अव्वल स्थान पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मध्यमवर्गीय कुटुंबातील असलेल्या कुमकुमचे वडील मिठाईचे बॉक्स बनविण्याचे काम करतात. मला राष्ट्रीय स्पर्धेत खेळायचे होते, पण प्रशिक्षण प्रफुल्ल डांगे यांच्या आग्रहामुळे मी वरिष्ठ गटाच्या चाचणीत सहभाग घेतला आणि यशस्वी झाले, असे कुमकुमने सांगितले. प्रशिक्षक डांगे यांच्या मते कुमकुममध्ये आशियाई आणि ऑलिम्पिक पदक जिंकण्याची प्रचंड क्षमता आहे.

२६ वर्षीय यशदीप भोगेची कारकीर्द प्रेरणादायी आहे. २०१९ मध्ये पक्षाघाताच्या धक्क्यातून सावरून त्याने जिद्दीने पुनरागमन केले. निवड चाचणीत १२.७५ गुणांसह तिसरा क्रमांक पटकावत त्याने भारतीय संघात पहिल्यांदाच स्थान मिळवले. रेल्वेत कार्यरत असलेल्या यशदीपने एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले असून त्याने यापुर्वी बँकॉक आशिया चषक आणि ढाका येथील आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. तो एक निर्भय खेळाडू आहे, अशा शब्दांत त्याचे प्रशिक्षक गणेश विश्वकर्मा यांनी त्याचे कौतुक केले आहे.

महाराष्ट्राकडे आता जागतिक दर्जाचे १० तिरंदाज असून सर्व १८ ते १३ वयोगटातील आहेत. २०२८ च्या ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्र भारताला निश्चितपणे पदक मिळवून देईल, या दिशेने आमचे प्रयत्न सुरू आहेत, असा विश्वास प्रमोद चांदूरकर यांनी व्यक्त केला आहे.

२०२५ मध्ये संमिश्र कामगिरीचा अनुभव घेतल्यानंतर विदर्भाचे कंपाऊंड तिरंदाज नागपूरचा ओजस प्रवीण देवतळे आणि अमरावतीची मधुरा धामणगावकर यांनी मेक्सिको आणि शांघाय येथे होणाऱ्या विश्वचषक स्टेज १ आणि २ साठी भारतीय कंपाऊंड तिरंदाजी संघात स्थान मिळवले आहे. याशिवाय साताऱ्याचे आदिती स्वामी आणि साहिल जाधव यांनीही भारतीय संघात स्थान मिळवले आहे.

## नागपूर जिल्हा परिषदेतही लागणार सीसीटीव्ही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० : पालघरच्या घटनेनंतर राज्य शासनाने सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे आदेश दिले आहे. त्यानंतर नागपूर जिल्हा परिषदेनेही आपल्या शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला. दर्जेदार सीसीटीव्ही लावण्यात येणार आहे. त्यासाठी व्हीएनआयटीची मदत जिल्हा परिषदेने घेण्याचे निश्चित केले आहे. सीसीटीव्हीसाठी प्रथमच व्हीएनआयटी मदत घेण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या १५०० जवळपास शाळा आहेत. यातील या शाळांना सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच देण्याचा मानस जिल्हा परिषदेचा आहे यात सहभागी सर्व कंत्राटदारांची बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविण्यात आली. विशिष्ट तपशीलाचे अभिप्राय नोंदविण्यात आले. शिक्षण विभागाने हा प्रस्ताव व्हीएनआयटीला पाठविला होता. ४५० शाळांसाठीचा हा प्रस्ताव आहे. जिल्हा परिषदेच्या १५१२ शाळा आहे. ज्या शाळांची पटसंख्या शंभरपेक्षा जास्त आहे. ४५० शाळांमध्ये हे कॅमेरे बसविण्यात येणार आहे.






## गुमशुदा व्यक्ति



जोसी शिरीस गोप

नाम जोसी शिरीस गोप उम्र 28 साल, (गुंगा बहरा है) गाव कसीरा, पोस्ट मुलका, त. जगन्नाथपुरी, पच्छीम सिंगमुम, झारखंड. ह.मु. प्लॉट नं. 26/2 और 18/2, एक कंपनी के क्वार्टर मौजा गौंडखैरी, अमरावती रोड, कळमेश्वर, नागपूर में रहता था. यह नागपूर सीटी में दि. 01/01/26 को घुमने के लिए आया था, तभी से वह लापता हुआ है. इस व्यक्ती का वर्णन : उचाई अंदाजे 5 फूट 5 इंच, रंग सावला, बांधा मजबूत, गोल चेहरा, बाल काले, आखे काली, शिक्षण 12 वी नापास, शरीर पर काले एवं सफेद रंग का फुल बाही का टी शर्ट उस पर फिका गुलाबी रंग का पट्टा है. तथा निले रंग की नाईट पॅन्ट पहना हुआ है. इसके दोनों भुवईयो के बिच मे एक तील है. इसे हिंदी एवं आदिवासी भाषा आती है. यह व्यक्ती किसी को दिखे तो निचे दिये गए पते पर या मोबाईल पर तुरंत संपर्क करें -

भगवान पळसपगार - 9637730677
सुदर्शन गोप - 9359175726